# वऱ्हाडसमाचार.

पुतस्क १३ | अकोला, रविवार ता० १२माहे जानेवारी सन १८७९ इसवी. | अंक २

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणोर लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ०६ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |
| कुटुंबमंत्री | ०६ |
| नवीन दिवाणी कायद्यावरील सवपुलोरे | ०६ |

## NOTICE

We the undersigned beg respectfully to inform all our constituents, customers and the public of out-stations that our business hitherto carried on under the name and style of Messrs Bomanjee Ookerjee & Co has from the 13th November 1878 been closed by mutual consent and all our contracts, estates and assets have been purchased and taken in his charge by Mr. Pstonjee Rustomjee our creditor.

Mr Pestonjee Rustomjee will henceforward and from the datted above specified conduct our business under the name and style of Messrs Pestonjee Rusmjee & Co.

All persons, departments and concerns indebted to our firm of Messrs Bomanjee Ookerjee & Co are hereby requested to pay the sums in which they are so indebted, to the said firm of Messrs Pestonjee Rustomjee & Co.

BOMANJEE OOKERJEE & Co.

Akola, 1[illegible] December 1878.

## जाहिरखबर.
## शिक्षणसार.

या नांवाचा नवीन ग्रंथ ( टॅाड्हेवांचा 'स्टूडंट्स म्यान्यूअल' याच्याच्या आधारानें तयार केलेला व शंका शांत सुंदर ठशांनीं छापलेला ) हीस तयार आहे. प्रत्येकास यांत विशेषत तरुण लोकांस स्वतःच्या सुधारणेस उपयोगी. यांतील विषयः— ( १ ) द्यासाचे उद्देश. ( २ ) संवयी- ( ) अभ्यास ( ४ ) वाचन ( ५ ) सत्कक्षप ( ६ ] व्यायाम. याची द्वादशपत्री पृष्ठें सुमारें १५० एकंदर झालीं आहेत. इतील ग्रंथाबद्दल प्रसिद्ध अशा विद्वानांचा चांगला अभिप्राय मिळाला आहे. पुस्तकें अकोल्यास वऱ्हाडसमाचार छापखान्यांत, मुंबईंत इंदुप्रकाशांत व खालीं सही करणाराकडे मिळतील. किंमत १२ आणे टपल खर्च घेणारावर नाहीं.

## जाहिरात.
## गृहवैद्य.

या नांवाचें पुस्तक तयार होत आहे. हें चांगलें असून सर्वांचे उपयोगीं पडणारें आहे. एखादे प्रसंगीं डाक्तर [illegible] स रोग कोणता आहे हें कळू[illegible] रीं औषधी उपाय करितां येईल [illegible] न भाग केले आहेत. १ला [illegible] गरोदर राहिल्यापासून तों बाळांत होइपर्यंत त्यांच्या प्रकृतीची व्यवस्था कशी ठेवावी व त्यांस औषधोपचार कोणते करावे याविषयीं. २रा भाग बालरोगचिकित्सा. ३रा भाग प्रौढ स्त्रिया व पुरुष यांस होणाऱ्या रोगांचे निरूपण व उपाय.

यांत जे उपचार सांगितले आहेत ते अनुभविक आहेत. औषधी यादी इंग्रजींत व मराठींत दिल्या आहेत. हें पुस्तक सर्वांच्या संग्रहीं असावें,

या पुस्तकाच्या आह्मी थोड्याच प्रती काढणार आहों. तर ज्यांस हें घ्यावयाचें असेल त्यांनीं अगाऊ किंमत १२ आणे खालीं सही करणाराकडे व एजंटाकडे जानेवारी १८७९ चे ३१ तारखेचे आंत पैसे पाठवावे. वर्गणीदार हिंदुस्थानांत कोठेंही असल्यास टपाल खर्च पडणार नाहीं. मागाहून घेणारांस १ रुपया व टपाल हशील पडेल.

एजंट.

मुंबई— ज्ञानोदय कर्ते, नवा नागपाडा.

नाशिक— मि० कमरुदीनभाई बोहरी.

ठाणें— मि० रामजीभोर नाजर आणि डा० लाजरस आब्राहाम.

पुणें— रें० मि० स्माल.

सोलापुर— मि० प्रभाकर बाळाजी केसकर.

अकोला— मि० नारायण बाळकृष्ण गद्रे.

धुळें— मि० भागाजी अंतोबा मिशन स्कुलमास्तर.

मालेगांव— रें० शंकर बळवंत.

शरणपुर— मि० ल्युकास मलोबा.

मुंबई तारीख १२ माहे डिसेंबर सन १८७८

नोटिस.

उदेभान वल्द रामजी जोहम रहाणार मौजे कानडी प्रगणे पिंजर तालुके अकोलें यास रामधन शिवनारायण दुकान मौजे इराईत तालुके अकोलें याजकडून नोटिस देण्यात येतें कीं, तुह्माकडे रामगोपाळ मारवाडी याजबद्दल जवारी मुद्दल खंडी १ व दोन वर्षांची दिढी १ खंडी आणि तरटाचीं पोतीं १६ एकंदर दोन खंडी जवारी व १६ पोतीं येणें आहेत ते ही नोटिस पावल्यापासून ३ दिवसांचें आंत आणून द्यावें. नाहींपेक्षां याबद्दल फिर्याद करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख ९ माहे जानेवारी १८७८ इसवी.

( सही ) रामधन शिवनारायण

दस्तुर खुद्द.

## कृष्णाकुमारी काव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक.

[illegible]ताति शास्त्री
[illegible] अनेक शास्त्रीं ॥
[illegible] त्यांत आहे,
[illegible]शय एथ राहे । ४६ ॥
असें मनीं ये ह्मणुनीच हो, ही
मी सांगतो गोष्ट पुढील कांहीं
ती वर्णिला हेतु अपत्यनाशा
दृष्टांत आणील तया प्रकाशा ३४७
प्रायश्चित्तविधिज्ञ पाहाति मुनी
कन्यास्नुषातिक्रमीं,
पापाची समताचि यास्तव अतां
दृष्टांत योजीन मी
झाला जो धृतराष्ट्र कौरवकुळीं
त्यानें स्नुषा गांजिली
याची तच्छतपुत्रनाशजनितें
शोकें तनू भाजिली ३४८
कन्येचा वध हा सुनेचि करवी
तो मानहानीच ती,
भासे यास्तव तारतम्य परि, या
चित्तीं न घे सन्मती
"सुतेचा वध मानहानिच" अशी
खोटी न दे भारती,
कीं साक्षाद्यदुनायकेंचि कथिली
श्रीमन्महाभारतीं ३४९
धर्मा कर्ण रणांत विव्हल करी
हाणोनि मर्मी शरें,
तेव्हां तो निजरक्षकास वदला
दुःखाचिया निर्भरें
"पार्था दुर्बळ तूं न गांडिव धनू
सांजे तुला दे परा"
ऐसें अर्जुन ऐकतांचि वच हें
झाला मनीं बावरा ३५०
कीं ऐसे अपमानवाक्य वदता
मारीन पूज्यासही,
ही संधा उठवी तया, न कुपिता
वारी जया रुद्रही
तो धर्मास वधावयाचि उठला
कोपोनि, तेव्हां हरी
हिंसेसी समकृत्य सांगुनि तया
त्या संकटीं सांवरी ३५१
"बा जें जीवन आपुलें, नच कधीं
आज्ञेस उल्लंघिलें
ज्याच्या आंपण, त्यास आज वधितो,
त्वां हें कसें कल्पिलें
हे धर्म जिता, असत्य न तुझी
होय प्रतिज्ञा, अशी
ओं शास्त्रमतेंचि युक्ति, कथितों
तो ऐक बा तूं कशी ३५२
धिक्कार अपमान जो गुरुजनीं
तो होय त्याचा वध,
ज्ञाता तूं ऐसशी ह्मणूनि कथितों
नेणो अतां सावध,
या न्यायें हृदात्मजेसि वधिलें
ऐसें न्हे काय जी,
कीं केला अर्जुन दुर्वच तिचा,
पावे [illegible] अतें दुजी ३५३
असू सुने [illegible] अपमानिशी,
हरी, ह्मणोनी शतपुत्र [illegible]
"ज्याला नसे यत्नशतेंहि [illegible]का,"
त्या पावला तो धृतराष्ट्र शो[illegible] ३५४
दृष्टांत तो योग्यचि भीमसिंगा,
कीं बाप तो यावरि तोचि इंगा
हेतू सुतेचीच अशास हत्या,
तेणें मृती ऊनशतां अपत्यां ३५५
आर्या.
तो भीमसिंग मेला
जरठार्णी घोर दुःख भोगीत
धन्य कुमारी जीतें ।
गाती गायक अजूनिही गीत ॥ ३५६ ॥
परजीवातें मानुनि
औषध, जो घालवी स्वजीवाचा ॥
रोग, तया दुष्ट पशुच
ह्मणती बुध, ज्या नसे दुजी वाचा ३५७
श्लोक
संसारीं परिणाम जो सरस तो
नाहीं कधीं पाहिला ।
देहातें ह्मणतात मी, परि दिसे
काळास तो वाहिला ॥
विद्याशिल्पपराक्रमादि गुण ते
होतात एकीकडे;
ऐसें पाहुनि घातपात करिती,
आश्चर्य हें गेंकडे ॥ ३५८ ॥
हे सत्य मूढा न विवेक बाणे ।
तेणें न तो धर्म अधर्म जाणे ॥
परि क्षमा नाहिच या अधर्मी
तो जीव घेईल डसोनि मर्मी ३५९
आर्या.
हे मूढा कळविति हे
'पशुला चाबूकसेच' इतिहास
तरिहि न घेती यांचा
होतो लोकहृदयांत परिहास ३६०
कृष्णाकुमारिकेचा
आहे इतिहास अल्प गद्यात्मा ॥

सप्तजनांनीं तो
केला ज्या हा विशाळ पद्यांचा ॥ ३६१ ॥
सतराशें पंचाण्णव सालीं
श्रीशालिवाहन शकाच्या ॥
हे पूर्ण जाहली कृति
शिवपक्षीं पंचमीस माघाच्या ॥ ३६२ ॥
समाप्त.

## वऱ्हाडसमाचार

मिति पौष कृष्ण ४ शके १८००

म्हैसूरचें राज्य ब्रिटिश सरकारांनीं तेथील राजाचें स्वाधीन करणार या विषयीं विलायतेहून मंजुरांत येऊन व सनदपत्र प्रसिद्ध झालें आहेत. आतां समारंभ लवकरच होईल.

## रा. रा. वामनराव कृष्ण देशमुख यांचा मृत्यु.

आह्मास लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं, वऱ्हाडांतील शाळा खात्याचे डायरेक्टर साहेबांचे हेड क्लार्क रा. रा. वामनराव कृष्ण देशमुख हे तारीख ३० माहे दिसेंबर सन १८७८ इसवी सोमवार रोजीं मुंबईमुक्कामीं स्वर्गवासी झाले. हें ऐकून त्यांचे इष्टमित्रांस व नेबद्ध ह्मणून त्यांस साधारणपणें ओळखित होते तेवढ्यांस अतिशय वाईट वाटल्यावाचून रहाणार नाहीं. कारण हे जसे थोर घराण्यांतील होते तसेच मनाचेही थोर होते, नीतिमान होते, व गंभीर होते, व्यवहारांत चोख होते; आणि त्यांच्या एकंदर वर्तनक्रमाकडे नजर दिली तर ते इतके नियमितपणानें व दुष्कृतिविरहित वागत असत कीं, हा त्यांच्यावरील अकालीं मरणाचा घाला केवळ त्यांच्या वर्तनक्रमांतील चुकीनें आला नसून ईश्वराचे दरबारी कांहीं चलबिचल होऊन आला असावा असें वाटतें.

वामनराव हे कोंकणांतील रेवदंड्याचे देशमुख असून मुंबईसही यांचें एक मोठें घर आहे. यांचा विद्याभ्यास मुंबईसच होऊन प्रथम इंदुरास विद्याकडे हे शिक्षक झाले व तीन वर्षें त्यांची स्वारी दक्षिणेतून फिरत होती त्या बरोबर हे होते. नंतर मुंबईस यांनीं एक नोकरी धरिली होती. पुढें सन १८६७ इसवी सालीं हे चिखलीस ७५ रुपयांवर हेडमास्तरचे जागीं वऱ्हाडांत आले. तेथून यांची बदली वाशीम इं. म. स्कुलावर १०० रुपये पगारावर झाली. व सन १८७१ इसवींत एथील सरकारी बुकडेपोचे क्युरेटरचे जागीं जमाखर्चांत चोख, व्यवस्थित व हुशार गृहस्थाची आवश्यकता दिसून आलेवरून उत्तम [illegible] साहेब यांनीं वामनरावांला अकोल्यास आणिलें व तेही काम त्यांनीं उत्तम प्रकारें केल्यावरून सन १८७६ सालीं ते १२५ रुपयांवर डायरेक्टर साहेबांचे हेडक्लार्क झाले. या जागेचा ते उपभोग घेत आहेत तोंच गतवर्षीं जानेवारींत त्यास संधिवातानें घालें. ह्मणून गेल्या एप्रिल मध्यें तीन महिन्यांची रजा घेऊन हे औषधोपचारार्थ मुंबईस गेले व जून अखेर परत एथें आले. तेव्हां मूळ संधिवाताचे दुःखांतून जरी ते बरे मोकळे झाले होते तरी त्यांचे अंगांत अशक्तता जाऊन त्यांस यावी तशी शक्ति आली नव्हती. ह्मणून थोड्याच दिवसांनीं त्यांस पुन्हा ताप वगैरे येऊं लागला व अन्नद्वेष पडला ह्मणून पुन्हा ३ महिन्यांची रजा घेऊन ते मुंबईस गेले व आणखी तीन महिन्यांची रजा वाढविली व चांगल्या चांगल्या वैद्यांचे औषधोपचार केले; परंतु दिवसें दिवस प्रकृति बिघडत जाऊन गेले ३० वे तारखेस त्यांचा अंतकाळ झाला.

वामनरावासारख्या सशक्त, नियमित व तरुण गृहस्थावरही मृत्यूनें घाला घातला. यावरून फार विस्मय वाटतो, शाळाखात्यांतून वामनराव बाळाजी सारखा बिनमोल मोहरा नुकताच गेला व त्याचे मागून हल्लीं हे एक रत्न गेलें यावरून या खात्याचें व आमचे अकोल्याचे मंडळीचें मोठी हानि झाली; याबद्दल पदोपदीं दुःख वाटतें.

वामनराव चांगले विद्वान होते. त्यांनीं सुहास्यवदना ह्मणून एक नाटक लिहिलें आहे. ते ज्ञानसंग्रह पुस्तकांत हमेशा लिहीत असत, व आमच्या वऱ्हाडसमाचारांतही चांगल्या माहितीच्या आणि शोधाच्या विषयावर लिहिण्यांत कधीं कधीं त्यांचा हात असे. त्यांनीं बहुत दरगरीबांना सोईस लाविलें आहे व कोणासही चांगली सल्ला मसलत देण्यास ते कधीं संकुचित नसत. ह्मणून अशांचें मरण हें खास मोठें विनाशकारक होय यांत संशय नाहीं.

वामनरावाचें वय ३७ वर्षांचें होतें. यांचे एक बंधू चिंतोपंत ह्मणून मुंबईस छापखान्याचे व्यापारी आहेत. शिवाय वामनरावाना कुटुंब, तीन मुलगे, आणि एक मुलगी आहे मुलीचें लग्न झालें आहे. मोठा मुलगा १६ वर्षांचा आहे त्याचें लग्न झालेलें नाहीं. व बाकीचे दोन मुलगे ६ व ४ वर्षांचे आहेत. या सर्वांच्या विद्याभ्यासास त्यांच्या मरणानें मोठा प्रत्यवाय आला. हें त्या लेकरांचें दुर्दैव ह्मणावयाचें, दुसरें काय !

## दवाखान्याचे बाबदींत हिंदुस्थान सरकारचा ठराव.

या बाबदींतील खालील ठराव मे० क्या० बुल्क साहेब एथील डिपुटी कमिशनर यांनीं आह्मांस माहितीकरितां पाठविला त्याबद्दल आह्मी त्यांचे आभार मानून त्यांतील तात्पर्य प्रसिद्ध करितों.

वऱ्हाडांतील दवाखान्यासंबंधी कांहीं खर्च लोकलफंडांतून होत असत ते तारीख एप्रिल सन १८७९ इसवीपासून प्राविन्शियल फंडांतून करण्याविषयीं हिंदुस्थान सरकाराचा ठराव झाला आहे.

एथें दवाखान्याचा इस्टाब्लिशमेंट खर्च २४००० रुपये व युरोपियन औषधें आणि शस्त्रें विकतचीं शस्त्रें यांचा खर्च ६९०० मिळून ३०,९०० रुपये खर्च होतो. यांत आज पर्यंत ९,९१२ रुपये प्राविन्शियल फंडांतून दिले जात असत बाकी २०,९८८ रुपये लोकल फंडांतून दिले जात असत ते सर्व आतां प्राविन्शियल फंडांतून देत जावेत. या शिवायचे खर्च ह्मणजे.—

हलके प्रतीचे नोकरांचा पगार, इकडील बाजारांत मिळणाऱ्या औषधीचा खर्च, आजाऱ्यांचा भोजन खर्च, सादिलवार खर्च, आणि इमारती संबंधी खर्च, कांहीं लोकलफंडांतून व कांहीं लोकांच्या वर्गणींतून करीत जावा.

देवी काढण्याचे कामाचा खर्च १६,८४३ रुपये. तसेच ग्रहांचे वेध घेण्याचे महकम्याकरितां व जनन मरणाचे नोंदणी करितां २,८८० रुपये खर्च आहे यांतून पहिल्या रकमेंत ८,६०४ रुपये व दुसऱ्या रकमेंत ११०० रुपये लोकल फंडांतून मिळनात ते न घेतां सर्व खर्च प्राविन्शियल फंडांतून करित जावा. या नवीन वहिवाटीनें एकंदरींत लोकल फंडाकडून मिळणारे दवाखान्याकडील दोन हजार पांचशें अठ्ठयाशी रुपये, देवीखात्याकडील ८,६०४ व ग्रहांचे वेध आणि जननमरण यांकडील ११०० मिळून ३०,२९२ रुपये कमी होऊन ते प्राविन्शियल फंडांतून द्यावयाचे आहेत असें समजावें.

दवाखाने किती प्रकारचे असावेत हें ठरविणें इलाख्याच्या सरकारचें काम आहे.

लढाई—या आठवड्यांत कुरम भागाची फौज खास्त प्रांतांत शिरली आहे. तिची व ४००० मांगल नांवाच्या लोकांची एक लढाई झाली. तींत ब्रिटिश फौजेनें त्यांस पळवून लाविलें व सुमार ८० लोक धरून नेले व त्यांचीं १० गावें जाळिलीं.

अमीर शेर अल्ली रशिया देशांत गेला असें तिकडील पत्रांत प्रसिद्ध झालें आहे. सेंटपिटर्सबुर्ग एथें रशियाचा बादशाहा झार याची व अमीराची भेट होणार आहे असें ह्मणतात. अमीराचा बेत आहे कीं, युरोप खंडांतील मोठमोठाल्या राष्ट्रांकडे इंग्लिशाविषयीं गाऱ्हाणें करावें व त्यांच्या मध्यस्थीनें आपली तजवीज करून घ्यावी. इंग्लिश फौजेचा बेत किल्ल्या किल्ल्यांनीं पाणी धरून रहाण्याचा आहे. व कित्येक इंग्रजी पत्रांतून मजकूर येऊं लागला आहे त कीं काबुलचें राज्य हिंदुस्थानचे राज्यास जोडावें.

## श्री० थोरले माधवराव पेशवे यांचें भाषण.

(मागील अंकावरून पुढें चालु)

आह्मी पेशव्यांनीं आज ५० वर्षांत सुमार १०० लढाया मारिल्या असतील. या बहुतेकांत परमेश्वरानें यशच दिलें. आणि स्वराज्याची नौबद गाजविली. पेशव्यांचें शौर्य आणि वैभव माहित नाहीं असा पुरुष हिमालयापासून दक्षिण समुद्रापर्यंत हजार कोसांत कोणी आढळणार नाहीं. अशा वैभवाचा योद्धा विरस गुदस्तां झाला. त्याजबद्दल वाईट वाटतें! तथापि हुरूप मोडू नये. निरंतर घोड्यावर बसणारा एकादे वेळ पडला तर त्याच्या स्वारीत काहीं कमी पणा नाहीं. तीक्ष्ण शस्त्रानें हजार वेळ घाय पारले तें एकादे वेळ निसटतें गेलें तर शस्त्राचा दोष नाहीं. कुशल कारागिरानें १०० चित्रें सुरेख काढिलीं त्यांत एकादें सुबकपणांत जरा वेगळ्या डौलाचें झालें तर तो विशेष दोष नव्हे. त्याप्रमाणें गेल्या सालच्या पानपतवरच्या लढाईत अखेर पर्यंत जय होईल असें दिसत असतां गोष्ट घसरली हा वेळेचा गुण ह्मणावयाचा! बाकी ज्या अबदालीला या लढायांत जय मिळाला तो मोठा महावीर होता असें नाहीं. त्याजजवळ फौज अतोनात होती असें नाहीं, त्याचे सेनापति रणधुरंधर होते असें नाहीं. कवायत वगैरे यांची चांगली होती असें नाहीं. यांची सारी ४५००० हजार फौज होती, अन्नसामग्री विशेष नव्हती, आणि नामांकित कोणी सरदारही त्याचे कडे नव्हते. आपली निवडक फौज ५५००० होती, पेंढाऱ्याचे १५००० स्वार होते तोफा २०० होत्या बुणगे २ लक्ष होते, एकून खजीना दोन कोटीचा मेला होता. आणि शिंदे होळकर यांचे रोख ३ कोटि रुपये जवळ होते एवढें साहित्य! शिवाय सरदार कोण कोणते होते ह्मणाल तर, जनकोजी शिंदे, मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, जानोजी भोसले, नारोशंकर, तसेच पुरंदरे, विंचूरकर, मेहेंदळे, बुंदेले, माणकेश्वर, असे असे नामांकित सरदार कीं जे एकेक शंभरा शंभराला भारी ते सर्व या लढाईत असतां परिणाम विलग झाला, ही परस्वाधीनची गोष्ट आहे! अण्णा साहेब माझ्याच्या तोंडावर अडीच प्रहर सारखे लढत होते. त्यांनीं शत्रूचे दहा पाच सरदार मारले आणि तीन हजार सैन्य लोळविलें. इतक्यांत त्यांच्या मागून एकानें जाऊन मानेवर तरवारीचा वार केला. त्याच्या जबर वेदनेनें ते घोड्यावरून खालीं पडले. ही त्याची अवस्था पाहून भाऊसाहेब हत्तीवरून उतरून त्याजवळ आले त्यांनीं त्यांला कुरवाळलें, त्याच्या अंगावरून हात फिरविला, आणि उचलून हत्तीवर बसवून तळाकडे पाठविलें. नंतर ते आपल्या पवनवेग घोड्यावर बसले, आणि शत्रूचा व्यूह फोडून मध्यें गेले. तों इकडे धनी गमावले, दोघ धनी गमावले, चंद्रसूर्य एकदमच जगांतून नाहींसे झाले अशी गुल उडाली आणि सर्व इतस्ततः धावूं लागले व उदास झाले. त्यावेळस शत्रूनें शस्त्र ठेविलेल्या लोकांवर, तर लोकांवर, आणि बायकामुलांवर, शस्त्र चालवून व धर पकड करून मनस्वी अति नीच, अघोर, रानटीपणाचे असें निर्दय कृत्य केलें; याचा मुखांतून उच्चार करणें सुद्धां बरें वाटत नाहीं. शिव! शिव! तरी

अबदालिनें या जयामुळें फुगून नाक न करावें असें कांहीं नाहीं. आह्मी ९ वर्षांचे होतों तेव्हांची गोष्ट अह्माला आठवते कीं, रघुनाथराव काका साहेबांनीं या अबदालीला पळतांभुई थोडी केली होती. त्या पासून मुलतान लाहोर हीं ठाणीं घेतलीं आणि त्याला त्याच्या मुलखांत हाकून लाविलें. पण तो तें विसरला! कांहीं चिंता नाहीं. पुन्हा वेळ येईल. तो फुगलेला शिखानष्ट पुन्हा येईल. आपण त्यावर पुन्हो जाऊ. आतां त्याची नापली घेतली आहे. लक्षांत ठेवावें कीं, या माधवरावाची हा प्रखर तरवार त्या अबदालीच्या रक्तानें न्हल्या शिवाय कधीं रहावयाची नाहीं. प्रसंग मात्र आला पाहिजे. पु. चा.

## वऱ्हाड.

### दरबारच्या वेळचीं बक्षिसें.

वाईकर पिरथम पाटील यांनीं व त्यांचा नोकर सोभाशिंग यानें पचगव्हाणचे डाक्यांतील कैदी पकडण्यास चांगली मदत केली सबब पाटील यांस २५ रुपयांचें शेला पागोटें व सोभाशिंग यास १५ रुपये असे दरबारांत बक्षीस मिळालें. मारोडीकर केवळशिंग चौकीदार व अन्या महार यांनीं पळालेले कैदी पकडण्यास सहाय केलें याजकरितां त्यांस तीस तीस रुपये दरबारांत बक्षिस दिले. हिवरखेडकर शेख महबूब यास ९ रुपये बक्षीस दिलें. व डिवरखेडचे आणखी तीन इसम सरदार बेग, हशम बेग, आणि हुसेन भिल्ल यांस वीस रुपये बक्षीस देण्याचे होते पण ते दरबारचे दिवशीं आले नाहीत ह्मणून डिपुटी कमिशनर साहेबांची स्वारी तिकडे जाईल तेव्हां त्यांचे गावीं त्यास तर्दहू बक्षीस देण्याची योजना केली आहे.

शिवाय शाळाखात्यास व दवाख[illegible] ज्यांनीं चांगली मदत दिली त्या[illegible]टोफिकिटें दिलीं आहेत [illegible]नेशी बरीच मोठी [illegible] पुढील अंकांत लिहू.

रा. रा. कृष्णराव श्रीनिवास अकोला तहशिलींतील २५ रुपयाचे कारकून यांची २५ वर्षांहून अधिक नोकरी झाल्यावरून त्यांनीं पेनशनाचा अर्ज केला आहे व डाक्टरांनीं ही त्यांची वृध्धावस्था कबूल केली असें समजतें.

मुंबई गव्हर्मेंट गॅझेटांत एक पत्र छापलें आहे त्यावरून समजतें कीं गेल्या आगष्ट महिन्यात वऱ्हाडांत ३२३३३ मनुष्यें मेलीं. व फक्त ६८११ जन्मलीं. मृतांची संख्या दरमहा वाढत आहे. याजकरितां डा० लिटल साहेब स्यानिटरी कमिशनर यांनीं या गोष्टीकडे चांगलें लक्ष पुरवावें. गेल्या जुलई आगष्ट या च्यार महिन्यांत वऱ्हाडांत एक लाख लोक मेले. हा केवढा प्रळय आहे!

उर्दू अकबारांत लिहिलें आहे कीं, मलकापुरास दवाखाना, पुस्तकालय, शाळा यांस मदत देण्या क[illegible]तां वर्गणी जमत होती तांत रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं कांहीं द्यावें ह्मणून लोकांनीं शब्द टाकिला असतां ते ह्मणाले कीं, सरकार तर्फे जमा होणाऱ्या वर्गणींत आह्मी सामील होणें उचित नाहीं. व पैसे वाचविण्याकडे आपण पाहिलें नाहीं हें लोकांस दिसावें ह्मणून दोन तीनशें रुपये खर्चून मोहर्मा निमित्त मुसलमान लोकांस त्यांनीं मोठी मेजवानी दिली वर्गणी दिल्यानें अक्षय चांगल्या कामीं लागले असते असे पैसे इकड खर्च केल्यानें केवळ मातींत घातल्याप्रमाणें झाले!

आह्मांस या विषयीं कांहीं माहित नाहीं, पण ही गोष्ट अशी नसेल तर फार चांगलें!

मि० लिट्न साहेब इकडील असिस्टंट कमिशनर मद्रास इलाख्यांत दुष्काळा संबंधी विशेष कामाकरितां पुष्कळ दिवस गेले होते. ते या आठवड्यांत परत आले. व सोमवारीं मि० हेर साहेबांचा चार्ज घेऊन काम पाहूं लागले.

मि० हेर साहेब अकोल्याचे असिस्टंट कमिशनर यांस ३ तालुक्याचें मुलकी काम दिलें.

रा. रा. केशवराव महिपत खरकर नवीन एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर गेले रविवारीं एथें आले. यांनकडे काम आतां लवकरच वाटून देतील. ते उमरावतीहून आपली सर्व मंडळी आणण्या करितां पुन्हा तिकडे गेले आहेत.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, मे० दस्तुर बहिमनजी [illegible] सी. आय. ई. याचे बंधू [illegible] दस्तुर होसंगजी सा[illegible]कन कालेजांत प्रोफेसर [illegible] त्यास राव बहादूर विनायकराव वासुदेव पर्शियन ट्रान्सलेटर यांचे जागेवर नेमावें असा सरकारचा विचार झाला आहे.

अकोल्याचे मिडल क्लास स्कुलावर उमरावती हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर रा. रा. लक्ष्मण कृष्ण चिपळुणकर बी. ए. कैलासवासी कृष्ण शास्त्री चिपळुणकर यांचे धाकटे चिरंजीव यांस आफिशिएटिंग हेड मास्तर नेमले ही निवडणूक रा. ब. डायरेक्टर साहेब यांनीं चांगली केली. रा. रा. पांडुरंग दामोदर यांची रजा जसजशी रेंगाळत चालली तसतशी त्यांची जागा आवळत चालली आहे असें दिसतें.

अकोल्यास पहिले तारखेस छोटासा दरबार झाला या प्रमाणे काल उमरावतीस ही झाला असें समजतें. या करितां रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर स्वारीतून काल सकाळीं एथें येऊन उमरावतीकडे गेले. आज परत येणार आहेत.

रा. रा. वामन रघुनाथ जोशी जळगावचे हेडमास्तर यांचीं शाळा डायरेक्टर साहेबांचे तपासणीस आली नाहीं ह्मणून त्यांनीं त्यांना १०० रुपये पगार होता तो ७५ केला असें समजतें.

एथील हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर रा. रा. कृष्णाजी मल्हार यांस ५० रुपये पगार होता तो ६० रुपये झाला.

रा. रा. निळकंठराव नारायण भट एथील ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपाल हे आज उद्या सुटी असल्यामुळें काल मलकापुरास आपले बंधूस भेटावयास गेले.

उमरावती हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर रा. रा. विश्वासराव रघुनाथ जोशी यांचे चिरंजीव रा. रा. मोरो विश्वनाथ या वर्षीं म्याट्रिक्युलेशनचे परिक्षेस गेले होते त्यांची परिक्षा उत्तम उतरली असें समजतें. व त्यास उत्तम लोकवासी डा. सिंक्लर साहेबांचें बक्षीस ६० रुपये व माणीकबाई बैरामजी भाई यांचें ६० रुपयांचें बक्षीस मिळालें. हें एकून आह्मास संतोष होतो.

रा. रा. आपाजी बळवंत एथील असिस्टंट कमिशनरचे शिरस्तेदार यवतमाळास गेले त्यांचे जागेवर तिकडून रा० रा० नारायण रावजी हे आले. ते येतांच आजारी होते आतां प्रकृती बरी होऊन कामावर जाऊ लागले आहेत. हे पूर्वीं रिविन्यू सर्वे खात्यांत ४५ रुपयावर राईटर होते ते खातें कमी झाल्यानें मुलकी खात्यांत यांचा वर्ग झाला. हे गृहस्थ तरुण असून इंग्लिश जाणणारे आहेत. एथें असिस्टंट कमिशनरकडे इंग्लिश जाणणारे असे शिरस्ते[illegible]

मि. निकोलेट्न साहेब उमरावतीचे स्मालकाज जडज रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

वऱ्हाडांत असिस्टंट कमिशनरची एक जागा रिकामी आहे ती मे० यासनखा साहेब उमरावतीचे अक्स्ट्रा यांस मिळणार असें वर्तमान आहे.

उमरावतीचे आफिशियेटिंग तहशिलदार रा. रा. गिरराव रामचंद्र यांस कायम केलें.

मि. गिल साहेब बारिस्टर ने सुरतेच्या वर्तमानपत्रकर्त्यांवरील मोकदम्यांत विलायतीस आले ते आपले चिरंजिवाकडे गेल्या आठवड्यात उमरावतीस आले होते त्यांचे चिरंजीव मे. फ्युसिल प्रेसकडे आहेत.

कमिशनर साहेबांचे शिरस्तेदार रा. रा. केशवराव जयकृष्ण देशपांडे यांस १२५ रुपये पगार होता तो १५० रु. झाला.

एथील डिपुटी कमिशनर आफिसांतील अकौंट कडील ५० रु. चे मराठी कारकून रा. स. शिवराम जयराम हे आजारी असून त्यांनीं दोन महिन्यांची रजा घेतली आहे व पुढें पेनशन घेण्याचा त्यांचा विचार आहे असें कळतें.

आमचे एथील प्रसिद्ध वकील रा. रा. दवराव विनायक यांच्या एका पायाला आगपैणीचा आजार होऊन ते चार महिने बेजार होते पुष्कळ औषधें करून थकले व पुण्यास किंवा नागपुरास जाण्याचा त्यांनीं विचार केला होता, इतक्यांत त्यांस समजलें कीं रा. रा. हणमंतरावजी राजूरकर एथें रजिस्ट्रार आहेत ते यावर उपाय चांगला करितात, मग त्यांजकडून उपाय करविण्यानें ८–१० दिवसांत त्यांचा पाय चांगला बरा झाला हें कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो. व तेणेंकरून हणमंतरावजीची वैद्यकी प्रसिद्धीस आली हेंही चांगलें झालें. कित्येक रोगावर रामबाण औषधें त्यांस ठाऊक आहेत असेंही आतां आह्मांस समजलें आहे.

हैदराबादहून सेंट्रल प्राविन्समध्यें जाण्याकरितां सुमार ३०० पायदळ शिपाई तारीख २९ दिसेंबर रोजीं निघाले आहेत हल्लीं त्यांचा मुकाम निर्मळ एथें आहे. आणखी सुमार १०–१२ दिवसांनीं वणीस जातील व तेथें तीन मुक्काम होऊन नंतर पुढें जाणार आहेत.

वणी एथील चारिटेबल डिस्पेन्सरीमध्यें तारीख ७ जानेवारी रोजीं कमिटीदारांची सभा झाली होती सर्वानुमतें या दवाखान्यामध्यें "इनडोअरपेशंटस" ह्मणजे दवाखान्यांत रहाणारे आजारी यांकरिता दवाखान्याचे अंगणांत एक वेगळें घर बांधावें असा विचार ठरला व त्याकरितां वर्गणीची यादी झाली तींत ४० रुपयांचे आकडे पडले आहेत आणखीही वर्गणी १०० रुपया पर्यंत जमेल असा अंदाज आहे.

## जाहिरखबर.


देण्यांत येत आहे कीं, मुलक अमानी हैदराबाद एथील सन १८७९। ८० सालाचे सर्व प्रकारचे अबकारी, देशी दारू, ताडी, अफू आणि अमली पदार्थ यांचा लिलाव खालीं लिहिलेल्या तारखांस होईल. ताडी व देशी दारू याचा लिलाव निरनिराळा केला जाईल. प्रत्येक लिलाव डिपुटी कमिशनर साहेब यांचे कचेरींत ११ वाजतां होईल.

वणी जिल्ह्याचा—तारीख ६ माहे फेब्रवारी सन १८७९ रोजीं.

उमरावती जिल्ह्याचा—तारीख ११ माहे फब्रुवारी सन १८७९ इसवी

इलिचपुर जिल्ह्याचा—तारीख २० माहे फेब्रवारी १८७९ रोजीं.

अकोले जिल्ह्याचा—तारीख २६ माहे फेब्रुवारी १८७९ रोजीं.

वाशिम जिल्ह्याचा—तारीख ३ माहे मार्च १८७९ इसवी रोजीं.

बुलढाणे जिल्ह्याचा—तारीख ११ माहे मार्च १८७९ इसवी रोजीं.

मक्तयाचे व लिलावाचे शर्तींची माहिती डिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींतून मिळवावी.

W. B. Jones
कमिशनर
हैदराबाद असाइन डिस्ट्रिक्ट


## वर्तमानसार

चे पागोटे [illegible] झाडाशीं होतें. हें खरें कीं काय तें सांगव[illegible] [illegible]तु मारलें असेल यांत शंका

यंदा मुंबईस म्याट्रिक्युलेशन परीक्षेत कोठील किती मुलें पास झालीं याचें टिपण असें:—

एल्फिन्स्टन हायस्कुल ४१, सेन्ट मेरी इन्स्टिट्युशन बांद्रे ९३, पुणें हायस्कूल २१, नांबप्रांप्रायटरी स्कूल १४, फोर्टहाय स्कूल १३, सर जे. जे. पार्शी बेनोव्हालेंट इन्स्टिटयुशन ८, नारायण जगुनाथ हायस्कूल ८, अमदाबाद हायस्कूल ७, राबर्ट मनीइन्स्टिटयुशन ७, धारवाड हाय स्कूल ७, विशपस हाय स्कूल पुणें ६, नाशिक हाय स्कूल ५, सुरत हाय स्कूल ५ हैदराबाद हाय स्कूल ५, चंदनवाडी हायस्कूल ५, राजाराम हाय स्कूल ५, रत्नागिरी हाय स्कूल ५, उमराती हाय स्कूल ४, बांबे हाय स्कूल ४, फ्री जनरल आसेम्ब्ली इन्स्टिटयुशन ४ बडोदा हाय स्कूल ४, पुना नेटिव्ह इस्टिटयुशन ३, भडोच हाय स्कूल ३, सर सी जहांगीर नवसरी मदरसा ३, सातारा हाय स्कूल ३, धुळे हाय स्कूल ३, सेंट विन्सेंट स्कूल २ कारवार हाय स्कूल २, बेळगाव सरदार हाय स्कूल २, काठेवाड हाय स्कूल २, सुरत मिशन स्कूल २, अमदाबाद आय पी मिशन स्कूल २. सेंट मेरीज स्कूल पुना २. नडियाद हाय स्कूल २, नांबिस्काटिश हायस्कूल १, भावनगर हाय स्कूल १, इंजिनियेरिंग हायस्कूल हैदराबाद १, शिकापुर हायस्कूल १, पुना इंजिनियरिंग कालेज १, अकोला हायस्कूल १, पुणा मिशनस्कूल १, बांबे प्रायव्हेट इंग्लिश स्कूल १, अहमदनगर हायस्कूल १, वैखासगी शिक्षणाचे २० मुलें पास झालीं

नेपाळचे वकील कलकत्यास व्हाईसराय साहेबांचे भेटीस आले आहेत.

मुंबईस मि० नरसी केशवजी नामें मात्याचें दिवाळें निघालें. हें दिवाळें सुमार दोड कोटीचें आहे.

दुष्काळ संबंधी चौकशीचें कमिशन मद्रास इलाख्याकडे वळलें.

मद्रास इलाख्यांत वयानानोर येथील तुरुंगांत कैदीस खाना देण्याचे नियमांत कांहीं बदल केल्यावरून मोठा दंगा झाला. त्यांत १ कैदी ठार मेला व ६ जखमी झाले. जेल सुप्रिटेंडेंट कर्नेल बापुचांप यांसही फार दुखापत झाली.

मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेब नगर पारकरवरून सिंधच्या ओसाड प्रदेशांतून तीन मजला करून पलीकडे अमरकोटकडे गेले आहेत.

ग्वालेरचे शिंदेसरकारची तबेत अजून दुरुस्त झाली नाहीं.

रेलवे कंपनीकडील नोकर लोकांस दंड होतात त्यांच्या फंडाची रकम बरीच वाढली आहे. ईस्ट इंडिया रेलवेकडील दंडाचा फंड एक लाख रुपयांवर जमला आहे. तसाच इस्टर्न रेलवेचाही पन्नास हजारांवर आहे. हे दंड विशेष होण्याचे कारण "गुन्हे इन्टेंपरन्स ह्मणजे" फार दारू पिऊन काम बरोबर न करणें हेच आहेत.

हिंदुस्थान सरकारानें चालू मालचे तारीख १ जानेवारी रोजीं ...कंप्यानियन आफ इंडियन येंपायर' हा किताब १४ थोर ...र आहे

स्तुती करावया... यथार्थपणें तूच ... इतर कोण... समर्थ होणार

गृहस्थांस दिला त्यांचीं नांवे येणेंप्रमाणें.

मिस्तर जी. डब्ल्यू आलेन

,, दस्तुर बहिमनजी जामासजी

,, डब्ल्यू. हिगवाय

,, एस. एस. ग्रोन

मेजर हिडायट अल्लीखान.

कर्नेल एफ. सी. इंपी

कर्नेल एल बी. जोन्स

बाबा केमशिंग

क्या. इ. एस लडलो

आर. जी. एल. मोलेस्वर्थ मीगु.

राजा मंगळसिंग बहादूर

डाक्टर डी. आर. थामसन

कर्नेल जे. एफ. टेनंट

मि. ए. उइगोट

इरानीं मोत्यें— सन १८७७–७८ या सालीं इरानी अखाताकडून या देशांत १७५०००० रुपयांचीं मोत्यें आलीं. त्या समुद्रांत दरसाल किती मोत्यें उत्पन्न होतात ह्मणजे किती निघतात हें सांगता येणार नाहीं सन १८६५ मध्यें ४०००००० चाळीस लक्ष रुपयांचीं मोत्यें निघालीं असें सर लुई पेली यांचें अनुमान आहे तिकडे मोत्यें काढण्याच्या वगैरे उद्योगावर ३५००० मनुष्यें पोट भरतात. तिकडून जे नाखुदा ह्मणजे तारवांचे मालक इकडे मोत्यांच्या खेपा आणतात त्यांस इकडील बनया लोक बरेंच नाडतात. तें असें कीं, हे नाखुदा आले ह्मणजे त्यांस बनया लोक धान्य वगैरे पाहिजे ती सामग्री व तंबाखू सुद्धां उधार पुरवितात आणि मग त्याच्या मोबदला पाहिजे त्या किमतीस त्यांचीं मोत्यें मागतात; आणि आपण यांच्या कर्जाच्या पाशांत गुतलो आहों असें पाहून त्या नाखुदांस त्यांचें ह्मणणें कबूल करून त्यांच्या कर्जांतून मुक्त होणें भाग पडतें नाहीं तर मुक्तता होणें कठीण. असो तिकडे मोत्यें काढण्याचे तीन मोसम किंवा ऋतु आहेत. पहिला एप्रिल महिन्याच्या मध्याच्या सुमारास सुरू होऊन सुमारें ४० दिवस असतो, दुसरा जूनपासुन सप्तेंबरपर्यंत असतो, व हाच सर्वांत मुख्य ऋतु आहे. आणि तिसरा हिवाळ्यांत येतो तेथील सरकारी अधिकारी समुद्र किनाऱ्यावर रहाणाऱ्या सर्व लोकांस मोत्यें काढून देतात, आणि त्या लोकांचे शेख ह्मणजे नाईक त्याबद्दल त्यावर कर बसवून यथास्थित पैसा मिळवितात, तेथील पाणबुडे आपल्या शारीर प्रकृतीस फार जपतात. ते खजूर, मासळी; काफी वगैरे अगदीं साधें अन्न खाऊन रहातात त्यांस, बहुत करून वेंठ वात रोग, वेड हे विकार होतात. पाण्यांत बुड्या मारण्याचें काम हमेशा केल्यानें आपले कांतडें सडूं नये ह्मणून ते दररोज रात्रीं निजण्याच्या वेळेस सर्वांगास तेल वगैरे मसाला लावीत असतात. ज्ञा. द.

काश्मिरांतील ५ लक्ष प्रजेपैकीं ३॥ लक्ष प्रजा गेले दुष्काळांत मेली.

कानस्टंटिनोपल एथें व्यापाराची स्थिति मोठी घाटाळ्याची झाली आहे.

## युरोपियन गारोड्यांचा चमत्कारिक खेळ.

आमच्या पृथील वाचकांपैकीं पुष्कळांस सदरील सांगितलेले गारोडी एथें आले असल्याचें कळलें असेल. हे नानातऱ्हेचे चमत्कारिक खेळ करतात. कापूस खाऊन तोंडांतून निरनिराळ्या रंगाच्या फिती काढणें, सुया खाऊन त्या तोंडांतून दोऱ्यांत ओवलेल्या अशा बाहेर काढणें व दुसरे चमत्कारिक खेळ करतात गेल्या सोमवारीं यांनीं जो खेळ केला त्यांत दोन चमत्कारिक प्रकार करून दाखविले ते असे. एक मजबूत पेटी प्रथम एका चऱ्हाटानें खालून वरून बांधून तिजवर एक जाडें आच्छादन घातलें व पुन्हा पहिल्याप्रमाणें दोरीनें ती पेटी बांधली. पेटी बांधणें तमाशा पहावयास आलेल्या लोकांपैकीं कांहींनीं केलें. गारोड्यांनीं बिलकूल हात लावला नाहीं. हें झाल्यावर ती पेटी एका खुल्या कपाटांत नेऊन ठेविली. कपाटाचे आंत एक बाई गेल्यावर त्या कपाटाची दारें लावलीं. दारें लावल्यापासून सुमारें दीड मिनिटांनीं ती पेटी पुनः बाहेर काढली व सोडून पहतात तो ती बाई आंत आहे असें नजरेस आलें. ही पेटी प्रथम बांधण्यास सुमारें दहा मिनिटें लागलीं व ती सोडण्यासही तितकींच लागलीं असतील. परंतु इतकी मजबूत पेटी बांधली असतांही ती बाई दीड मिनिटांत आंत गेली हें पाहून पहाण्यास आलेल्या लोकांस फार विस्मय झाला. याचप्रमाणें त्यांनीं दुसरा चमत्कार केला तो असा. प्रथम एका बाईस एका खुर्चीवर उभें केलें व तिचे दोन्ही हात लांब करून त्यांस बारिक दोन काठ्यांचा टेंका दिला. पुढें तिजवर कांहीं प्रयोग ( मेसमेरिझम ) करून ती निचेष्ठ केली व तिचे पायाखालची खुर्ची ...दून घेतली. नंतर दोन काठ्यांपैकीं एक काठी ...रून घेतली. पुढें निचेष्ठ झालेली बाई तशीच ... काठीचे आश्रयानें अधंतरी उभी होती. पुढे ... ड्यानें तिला वांकडी करून निजल्या सारखी केली. पाय लांब करून अशी निजलेली असतां तिला जमीनीचा अथवा दुसरा कशाचाही आधार नव्हता. फक्त डोक्याखालीं जो हात होता त्या हातास मात्र एका काठीचा आधार होता. बाकीच्या पसरलेल्या शरीरास कांहीं एक आधार नव्हता. या स्थितींत ती बाई सुमारें पांच मिनिटें असावी. पुढें तिला शुद्धीवर आणून उतरवून घेतली. याप्रमाणें हा विलक्षण चमत्कार करून दाखविला. हा चमत्कार पाहिला ह्मणजे नारदादि ऋषींच्या हवेंतून जाण्या येण्याबद्दल जें वर्णन केलें आहे तें खरें असावें अशी खात्री होईल ज्यांस सामर्थ्य असेल त्यांनीं मुख्यत्वें करून हा चमत्कार पहाण्याची संधी दवडूं नये असें आह्मी सूचवितों. ने. ओ.

## अबुसयद यानें केलेला न्याय.

अबु सैय्यद हा, एक ह्मातारा बेन महमद काजी याचा मुलगा होता. आपल्या बापाच्या मरणानंतर हा लहान मुलगा चांगले कायदे वगैरे शिकून आणि कुराण वगैरे वाचून प्रवीण झाला. त्याप्रमाणें तो मोठ्या योग्यतेस चढून आपल्या बापाच्या जागेवर काजी झाला. त्यास त्याच्या पूर्वजांची कांहीं मालमत्ता नव्हती; परंतु त्याच्या जवळ एक त्याचा चांगला समज आणि प्रमाणिकपणा हेंच काय तें त्याचें धन होतें. कांहीं काळानंतर तो न्यायाधीश झाला तेव्हां त्याच्या जवळ एक कज्या निवाड्यास आला. तो असा कीं, एक जोडे सांधणारा एका घरामध्यें रहात आहे. तें घर त्याचें स्वतःचें आहे असें तो समजत आहे. तें त्याला त्याच्या बापानें ठेविलें आहे. आणि त्याच्या बापाचीं कागदपत्रें ही त्याच्या जवळ आहेत. त्यास असें वाटत होतें कीं, जीं कागदपत्रें माझ्याजवळ आहेत तीं ह्या तंट्याला पुरीं आहेत. साक्षी वगैरे कांहीं एक नको. परंतु एक श्रीमंत व्यापारी त्या घरावर वारसा करूं लागला आणि ह्मणाला, घर माझें आहे. माझ्याजवळ देखील कागदपत्रें आहेत. आणि तीं त्याच्या नांवावर केलीं आहेत. त्या व्यापाऱ्यानें पहिल्यानें जाऊन त्या काजीचे कान फुकले. आणि त्यास पांचशें रुपयांची लांच देण्याचें कबूल केलें. त्यानें मनांत विचार केला कीं ह्या लहान मुलास वळविण्यास पांचशें रुपयेच पुष्कळ आहेत अबु सैयदानें ती पैशाची पिशवी घेतली आणि आपल्या मेजांत ठेविली. जेव्हां त्यांचा तंटा न्याय करण्या करितां आला तेव्हां त्या जोडे सांधणाऱ्या पेक्षां त्या सावकाराचीं कागदपत्रें खरीं झालीं. प्रश्न हाच कीं तीं खरीं आहेत; आणि त्यांच्या साक्षीदारांकडून पुरावा झाला असेल. त्या व्यापाऱ्यानें पुष्कळ साक्षी आणिले होते. त्यांनीं शपथा वगैरे घेऊन सांगितलें कीं हें घर खरोखर त्याच्या भावाचें आहे आणि त्यानें तें विकत घेऊन त्याचे पैसे देखील दिले. ह्मणून त्याचीं कागदपत्रें हीं खरीं आहेत.

शेवटीं सर्व बोलल्यावर काजी बोलला, तुह्मां दो... जवळही कागदपत्रें आहेत. ह्या जोडे सांधणा... ...कही साक्षी नाहीं परंतु ह्या सावकाराचे तर्फे ... साक्षी आहेत आणि तो आपलें मेज उघडून ... पिशवी काढून ह्मणाला, ह्या पिशवींत आणखी पांचशें साक्षीदार तुझ्या अप्रमाणिकपणाविषयीं आणि अयोग्यतेविषयीं चांगल्या रीतीनें साक्ष देत आहेत. ज्या मनुष्यास आपलें कारण खरें आहे असें वाटतें तो लांच देण्यास कधींहीं उत्सुक होणार नाहीं. ह्मणून तें घर आजपासून त्या गरीब मनुष्याचें आणि त्याचे वारसाचें आहे. हे पांचशें रुपये जे तूं मला इतक्या दुष्टपणानें दिलेस त्यांतुन १०० रुपये ह्या गरीब मनुष्यास देतों. कारण त्यास फार खर्च आणि श्रम झाले. आणि बाकीचे राहिलेले मशीदीच्या धर्म पेटींत टाकितों.

खरोखर अशावटच्या न्यायाच्या दिवशीं सर्व नाणें ज्यानीं लांचाबद्दल दिलें किंवा घेतलें तें ह्याप्रमाणेंच देवाच्या राज्यांत त्यांच्या विरुद्ध साक्ष देईल. ज्ञा. द.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला, रविवार ता० १९ माहे जानेवारी सन १८७९ इसवी. अंक ३


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी पावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले निबंध व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या हब्या | ०६ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |
| कुटुंबमंत्री | ०६ |
| नवीन दिवाणी कायदा वरील सर्क्युलरें | ०६ |

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० खालील मजकूर आपणास आवडल्यास पत्रांत घेण्याची कृपा व्हावी.

हे जगन्नियंत्या परमेश्वरा, तुझी स्तुति करावी तितकी थोडीच आहे. कारण तुझें कांहीं विलक्षण चातुर्य जड चैतन्यादि पदार्थांत असलेले गुणांवरून किंवा अंतर्गत रीतीनें घडत असलेले व्यापारावरून दिसून येतें. प्रभो, प्रत्येक अणुरेणूचे ठिकाणींही उत्पत्ति स्थिति लयादि लागलींच आहेत. व या सर्वांत तूं जाणता आहेस. इतकेंच नाहीं, तर जी तूं एकदा रचना करून टाकिली आहेस व गति दिली आहेस ती कल्पकल्पांतर्यंत फिरत असतां आज अनंत युगें लोटलीं असतील परंतु अद्याप त्या चक्राचा एकही फेरा पुरा झाला नाहीं. आतां हें खरें आहे कीं तुझी स्तुति करावयाला यथार्थपणें तूंच शोभतोस. इतर कोणी समर्थ होणार नाहीं. तूं प्रत्येकाचा उपयोग जाणतोस तेव्हां आह्मा मनुष्य जातीला केवळ इतर व्यासंगाप्रमाणें आपणास रिझविण्याकरितां एक विशेष प्रकारचें चित्र ह्मणून तूं निर्मिलें आहेस असें वाटतें. बरें या देहांत येऊन आह्मी मानवांनीं अवश्य कर्म काय करावें याचा विचार करीत बसलों तर दुसरें कांहीं सुचत नाहीं. काय ? जन्मास येणें आणि मरणें इतकेंच ? छेः ! असें तर कधीं न सेल! स्वयंपाक करावा आणि टाकून द्यावा ! वाडा बांधावा आणि मोडून टाकावा! असा हेतु कधींही नसतो आणि नसेल! तर मग हेतू तरी काय ? असें मनाला सहन वाटतें. उपयोगाशिवाय पदार्थ नाहीं व मनुष्याचा कांहीं उपयोग दिसत नाहीं ह्या सर्व खुणांवरून प्रभो, तूं स्तुतिप्रिय आहेस व ती तुला मनापासून आवडते, याकरितांच हा सर्व खटाटोप करून मानवी प्राणी उत्पन्न केला असावास असें दिसतें. आणि यावरून आह्मी मानवांनीं सदा सर्व काळ तुझी स्तुति करावी, तुझे उपकार स्मरावे, व तुझ योग्य हेतूनुरूप वर्तन करून तुला रिझवावें. आणि हें जर आमचे हातून झालें नाहीं तर आह्मी तुझे दृष्टीपरते होऊं असा मनाला बोध होतो. कळावें ही विनंती ता. १६ जानेवारी सन १८७९ इ.

ग. व.

रा. ग. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. प्रसन्नराघव नाटकाचें मराठी भाषांतर वाचित असतां त्यांत "कोठें तात? मुला विदेश सदनीं " असा भरत आणि कैकयी यांच्या प्रश्नोत्तराचा एक श्लोक आढळला त्यांत भरताचे ९ । ७ प्रश्न आहेत व त्यांचीं त्याच श्लोकांत कैकयीनें उत्तरें दिलीं आहेत. त्याचा मला मोठा चमत्कार वाटला. व तसा एकादा नवीन श्लोक करावा अशी कल्पना माझे मनांत आल्यावरून मी हा खालीं लिहिलेला श्लोक केला आहे. हा आपले वाचकांस चमत्कारिक वाटल्यास पहावा. यांत राम रावण युद्धप्रसंगांत कुंभकर्णास लढायीकरितां रावणानें जागे केलें तेव्हां त्यानें प्रश्न केले व त्यांचीं रावणानें उत्तरें दिलीं त्याचे वर्णन केलें आहे तो श्लोक असा:—

श्लोक.

कां हो जागविलें? प्रसंग पडला. तो काय? युध्द. प्रिया ॥

कोणाशी? नरवानरांशि. अनुजा जिंकी न कां तूं तया? ॥

मालाऽ नावर. पुत्र धाड? खपला. हा! वैर कां वाढलें? ॥

स्त्रीयोगें. सति कोणती? महिसुता! छी! कर्म ना हें भलें! ॥१॥

कळावें हे विनंती.

ग. व.

देउळघाट ता. १४ । १ । ७९

रा. ग. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. सालमजकुरी मोहोरम चांगलें होतील असें कोणासही वाटत नव्हतें. परंतु मे. तहशिलदार ता. चिखली यांची स्वारी एथील मोहोरमचा जलसा चांगला होतो असें ऐकून मुद्दाम एथें तो पहाण्यास आली होती. इत्यादी गोष्टीवरून मुसलमान लोकांना फारच हुरूप आला आणि त्यांणीं कर्ज वाम काढून हा दिवस साजरा केला. पहिल्या आठ तारखे पर्यंत कांहीं विशेष ह्मणण्यासारखें होत नाहीं. नवव्या तारखेस सर्व दिवस रस्त्यांनीं फकिरांचीं सोंगें गांवांत फकिरी मागत फिरतात व लोकांना फकिरीसाठीं बेजार करून टाकतात. त्याच दिवशीं ह्मणजे कत्तलच्या रात्रीं फार मौज होते. एकेक मशाल पांच मण वजनाची असते. ह्या मशाली जुन्यापान्या चिंध्यांच्या बनावलेल्या असतात. कित्येक मौजे साठीं लोकांच्या गाद्या रजया चोरून मशालीस लावतात. प्रत्येक मशालीचे वजन इतकें असतें कीं, तिचा भार सांवरण्यास सात आठ असामी लागतात. अशा मशाली बहुत केलेल्या असतात. रात्रीं १० वाजतां ह्या प्रज्वलित झाल्या ह्मणजे जिकडे तिकडे मुख्य मुख्य रस्त्यांनीं लखलखाट दिसतो. एथें मुसलमान लोकांचे दोन पक्ष आहेत. तेव्हां एकमेकावर चढकरून स्थितीचा विचार न होतां खर्च होतो. नालसाहेबांच्या स्वाऱ्या ११।१२ वाजण्याचे सुमारास मिरवण्यास उठतात. आसपासच्या खेड्यांचे लोक व थोडे बहुत दहा पंधरा कोसांपेक्षां अधिक अंतरावरचेही व गावांतले मिळून पांच पासून सात हजार पावेतो लोकांचा पहाण्यासाठीं समाज मिळतो. बुलढाण्याहून बंदोबस्ताकरितां आणलीं पोलिसाची मदत येत असते व एक चीफ येतात. या साली रा. रा. गणपतरावजी काम पहाणारे चीफ यांणीं चांगली व्यवस्था ठेविली होती तसेंच एथील जमादार यांनीं अति श्रम घेऊन उत्तम प्रकारचा बंदोबस्त ठेविल्यामुळें तंटा वगैरे होऊं दिला नाहीं. एका रात्रींत ६०० रुपयेपर्यंत तेलाचा सदहू कामास खर्च झाला. नालसाहेबांच्या स्वाऱ्या गेल्यानंतर पहाटेच्या सुमारास ताबुत सर्व एकत्र जमतात. सर्व गावांत मिरवूननंतर जागीं जातात. एथें पूर्वीं फार ताबुत असून उत्तम कळा कुसरीचें काम फार खर्चानें होत असे. परंतु आतां पंधरा विसाच्या आंतच संख्या असते व गरीबी लोकांनी फार तरी साधारण प्रतीचे काम करितात. चार पांच होतात त्यांतून एक तर अति चांगली केलेली असते. ह्या समयीं मानपान वगैरे बद्दल या लोकांत तंटे होतात परंतु लोकांत फारसें त्राण नाहीं यामुळें सर्व गोष्टी सुरळीत होतात. एथें मोमिन लोकांतही ताबुत असतात त्यांत नजरपेटे यांचा मोठा असतो. दहाव्या दिवशीं स्वाऱ्या अकरा वाजल्यापासून मिरवतात व दिवस मावळण्याचे समारास यद्या होऊन आश्यावर पुढें डोले उठून रात्रीं अकरा वाजतां विसर्जन पावतात.

तिजाच्या दिवशीं तांटा होत. ती मोठ्या कत्तलानें बनविलेली असते. पक्ष दोन असून तंटा एकच कां होतें हे समजत नाहीं. ह्या दिवशींही रात्रीं रोषनई असून ती उत्तम होऊन प्रेक्षकांचीही फार गर्दी असते. व ह्या च्या सोसाच्यानें तर कांवळ्या बनून जातात. सालमजकुरीं एथें फिरते गोंड लोक आले आहेत त्यांचा डेरा दोन महिन्यापासून एथे आहे. त्यांणींही स्वारी बसविली होती. नानाप्रकारच्या सोंगाच्या कामांत व गाणें ह्मणण्यांत, नाचणें उडणें वगैरेंत हे फार निपूण आहेत. ह्यांनीं कलालाच्या दुकानांत दारू तर उरूंच दिली नाहीं. अशी एथील मोहोरमाची हकीकत आहे.

अशा संधीस आपली पोळी साधून घेण्यास उचले लोक आले होते. त्यांनीं कोणास फसविलें पण अखेर पोलिसाकडून पकडले जाऊन हातांत कडी पडून बुलढाण्यास रवाना झाले. आतां त्यांची चौकशी चालली आहे असें ह्मणतात. त्यांच्यापाशीं कांहीं झाड्यामेतीं माल रिपापडला होता असें लोक बोलतात.

हे भिन्न जातें तों रोहिले आले. हे मोठे जबरदस्तीनें वागतात. यांची भाषा कोणाला कळत नाहीं. बायका, पोरें मिळून हे ३२ इसम होते. यांच्या बरोबर २९ घोडीं होतीं. यांच्यापाशीं चांगल्या चांगल्या विकण्यासाठीं वस्तु असतात, यांच्या जिनसाला कोणी पहाण्यासाठीं हात लावला कीं ते त्या खराब झाल्या असें ह्मणून त्यांची त्याच्यापासून चोपून किंमत अधिक उणी भरून घेतात. लोकांना दवलवा दिवसां फसविण्याची किती चांगली युक्ती ही! हे गावांत शिरले ह्मणजे कोणाला जुमानीत नाहींत. खेड्यापड्यांनीं तर यांची चांगली पोळी पिकते. हा कानडयाचा गाव तरी एथें यांनी दांडगाईनें दर शेरास दीड आण्यानें तांदुळ घेतले. बाजारांत रुपयाचे सात शेर तांदुळ मिळणें कठीण परंतु या लोकांनां रुपयाचे १०॥ शेर मिळाले व यांनीं सर्व जिनसा खाण्यापिण्याच्या अशाच मिळविल्या. या लोकांचा दहा वर्षांचा पोर आपला तरी आचे फटाणे उडत असतात. एथें आसपास शेंपन्नास पहून हे उतरले होते. बिनादिकत गव्हांच्या शेतांत घोडीं चारलीं कोणी यांस प्रतिबंध करण्यास गेलें तर हे मुष्टिमोदकही देण्यास चुकत नसत. यांच्या एथें आगमनानें लोकांत धस्ती उत्पन्न झाली होती परंतु वरील लिहिल्याशिवाय दुसरें कांहीं न करितां ते बुलढाण्याकडे चालते झाले. वाटेनें एक इसम आपल्या धन्याचा हरभरा राखित होता त्यानें त्यास हरभरा न उपटण्याविषयीं सांगितलें व जरा कांहीं तिखट बोलला इतक्यांत ह्यांचे पित्त खवळून त्या बिच्याऱ्यास बरेंच मारलें. कोणी ह्मणतात त्याच्याच डोक्याचें पागोटें घेऊन त्यास झाडाशीं बांधले होतें. हें खरें कीं काय तें सांगवत नाहीं. परंतु मारलें असेल यांत शंका नाहीं . का

रण या लोकांचा स्वभावच असा असतो.

हल्लीं एथें सरकारच्या हुकुमाप्रमाणें गांवच्या बाहेर गोठे बांधण्या विषयीं लोक सामानाची तयारी करीत आहेत. घाडेचे मुन्सरीम चिखली कचेरींतून जागा नेमून देण्यास आले होते. गांवच्या पश्चिम व दक्षिण भागीं जागा नेमून दे गेले. वैशाखमास येण्याचे पूर्वीं गोठे नंव बाहेर तयार होऊन गुरें तिकडे बांधण्यास लोक लागले ह्म जे अर्थातच गांवांतील घाण बाहेर जाऊन उष्णकाळीं रोगाची साथ उत्पन्न होण्याची भीति रहाणार नाहीं व हा नियम सर्वांच्या आरोग्यतेचा आहे असें पक्कें समजून सर्वांनीं गोठे बाहेर बांधण्याची त्वरा करावी. प्रथमारंभीं जरी ही गोष्ट कठीण आहे असें वाटतें तरी परिणामीं खरोखर चांगली आहे असें दिसून आल्याशिवाय रहावयाचें नाहीं.

आपला दास
एक
देउळघाटस्थ.

## वऱ्हाडसमाचार

मिति पौष कृष्ण १२ शके १८००

## अपूर्व कल्पनेची वाफेची छोटी गाडी.

दिवसानुदिवस कळा कौशल्याची व यांत्रीक कामाची कल्पना कोठपर्यंत वाढत जाईल यान्विषयीं कांहीं सांगवत नाहीं. मागें अचाट कृत्याला पांडव लेणीं असें ह्मणून आपण समाधान मानीत असूं. पण आतां नव्यः नव्या ज्या अद्भुत परी निघतात त्यांपुढें पांडव लेणीं कांहींच नाहींत. जीं कृत्यें ईश्वरावांचून कोणास व्हावयाचीं नाहींत तसलीं देखील मनुष्यें आपल्या कल्पनेनें काढूं लागली आहेत ते व्हा जगाची सुधारणा किती ह्मणून वर्णावी? रेलवेवरील गाडी, आगबोटी, तारायंत्रें हे केवढे महत्वाचे नवीन शोध झालेले आहेत! त्यांचें कौशल्य पाहिलें ह्मणजे बुद्धी थक्क होऊन जाते. तरी शिल्पकार मनुष्यांची कल्पना इतकेंच करून स्थीर राहिली नाहीं, तिचा शोध दिवसानुदिवस नवें नवे शोध करण्याकडे सारखी धाव घेत आहे. वाफेच्या यंत्राने छकड्याने चालविण्याची कला मुंबईस कित्येकांनीं पाहिली असेल. त्याप्रमाणें सडकेवरील खडी दाबण्याचें वाफेचें यंत्र रोलाबद्दल आगगाडी सारखें केलें आहे हेंही उमरावतीस एक आहे तें कित्येकांनीं पाहिलें असेल; तथापि हल्लीं आणखी अपूर्व कल्पना विलायतेस मि० व्याकबर्न साहेब या नावाच्या परम कुशल पुरुषानें काढिली आहे; ती ही कीं घोड्यांची गाडी घोड्याशिवाय वाफेच्या यंत्राने चालवावी! तिला विशेष खटपट नाहीं, अखेर पाण्याची वाफ, ती यंत्राला गति देऊन पुन्हा पाण्याचे रूपास जाते व तें पाणी पुन्हा यंत्रांत जाऊन वाफ सुरूं होते. या गाडीला अपघाताचें भय नाहीं. चांगल्या रस्त्याचें कारण नाहीं. चढावर, उतरणीवर, मागें, पुढें, डाव्या, उजव्या रस्त्यास पाहिजे तिकडे घोडे लाविलेल्या गाडी प्रमाणें या गाडीला नेतां आणतां येतें; तेव्हां ही किती विलक्षण कल्पना होय! व ही काढणाराचे देशावर केवढे उपकार ह्मणावयाचे! वाचकांस आह्मी या गाडीची थोडी माहिती कळवितो.

साधारण पहाणारास या नवीन गाडींत व दोन चाकी घोड्याच्या गाडींत इतकाच फरक दिसतो कीं या गाडीच्या दांड्या गाडी हाकणाराच्या जाग्या पासून सुमारें एक हात पुढें असोन त्या दांड्यांची पुढील टोकें मिळालेलीं असतात व त्या दांड्यांच्या मधें एक तिसरें चाक एका तिसरे उभे दांड्यांत बसविलेलें असोन त्या दांड्याचे वरचे बाजूस एक आडवी मूठ बसविलेली असती व या मुठीस दोन काढण्या बांधलेल्या असतात या काढण्यांनीं गाडी हाकणारा उजवे अगर डावे बाजूस गाडी वळवू सकतो.

या गाडीच्या मागचे बाजूस सुमारें लहान घागरी एवढें एक लोहपात्र असून त्यांत पेट घेणारा पदार्थ घालण्याकरितां लहान दार असतें. व तें दार सुलभ रीतीनें बंद अगर खुलें करण्याची तजवीज केलेली असती. हें लोहपात्र तांब्याच्या नळ्यानीं वेष्टिलेलें असून त्या नळ्या पाण्यानें भरलेल्या असतात. आणि या सर्वांवरून पातळ लोखंडी पत्र्याचें विशेष आकृतीचें एक झाकण रंग देऊन बसविलेलें असतें. त्यामुळें साधारण पहाणारास आंतील बारीक गोष्टी मुळींच दृष्टीस न पडून एकंदरींत ही गाडी साधारण दोन चाकी घोड्याच्या गाडीसारखीच दिसते.

वर सांगितलेल्या लोहपत्रांत पेट घेणारा पदार्थ पेटवून ठेविला ह्मणजे तांब्याच्या नळ्यांतील पाणी तापून त्याची वाफ होते. ही वाफ नळीच्या योगानें पुढील तिसरे चाकापर्यंत जाऊन त्यास गति उत्पन्न करिते. व गति उत्पन्न केल्यावर ती पुन्हा थिजून पाणी रूपानें पुन्हा पूर्वीं सांगितलेल्या नळ्यांत जाते. यामुळें अखेर पाण्यांत ही गाडी कित्येक तास चालवितां येते.

या गाडीचे चालण्यापासून कोणतेही प्रकारचा गोंगाट किंवा आगगाडीच्या शिळेप्रमाणें आवाज वगैरे कांहीं होत नाहीं. तसेंच पेट घेणारा पदार्थ एकदा पेटवून वर सांगितलेल लोहपात्राचें दार लावून घेतलें ह्मणजे धुरापासून किंवा त्या अग्नीच्या उष्णतेपासून गाडींत बसणारांस कोणत्याही प्रकारचा उपद्रव होत नाहीं.

ही गाडी साधारण रस्त्यावर एक तासांत चार कोस जाते. व साधारण टेकडावर जाणाऱ्या रस्त्यावर दर तासास २ कोस प्रमाणें चालते.

ही गाडी घोड्याच्या गाडीपेक्षांही हाकण्यास सुलभ असोन पाहिजे त्या ठिकाणीं उभी करण्यास किंवा हव्या त्या दिशेस नेण्यास किंवा अवघड वळणानें वाळवण्यास फार सुलभ जाते. इतकेंही असून आजपर्यंत शोध लागलेल्या वाफेनें चालणारे यंत्रापासून नुकसानीची जशी भीति आहे तशी या गाडीपासून अगदी नाहीं.

या वरील सर्व गोष्टींवरून ह्या गाडीच्या शोधकास मोठा फायदा होऊन ह्या गाड्याचा फैलाव सर्व पृथ्वीभर लवकरच होईल असें वाटतें.

## बडोदें संस्थानांत कालेज व लोकसुखार्थ बाग

मनुष्याच्या स्थितीचा प्रसंगानुसार पालट होतो तसा राष्ट्राचाही होतो. जें बडोदें संस्थान पैलवानांविषयीं, तमाशाविषयीं, खबुतरांच्या लग्नाविषयीं व अनेक मुर्खपणाविषयीं प्रख्यात होतें त्याची स्थिति अलीकडे बदलून तें चांगल्या चांगल्या कामाविषयीं कसें विख्यातीस येऊं लागलें आहे हें मनांत आणिलें ह्मणजे मोठा चमत्कार वाटतो! ज्या संस्थानचे राजे विद्याशून्य, ज्ञानशून्य, असे होऊन गेले तेथचेच हल्लींचे अल्पवयी राजे विद्याव्यसननिमग्न झाले आहेत व ते इंग्रजांमध्येंही प्रसिद्ध सभांतून भाषणें करूं लागले आहेत हा केवढा उत्तम फेरफार ह्मणावयाचा! जेथील जुने दिवाण खुशामस्कऱ्यांत मोडले जावयाचे व आपल्या कावेबाजीनें राजांस व्यसनांध करून सोडावयाचे तेथील दिवाण स्वतंत्र राज्याच्या पहाणीस निघूं लागले, राज्याची उत्तम सुधारणा करूं लागले, च्यार सुगर मनुष्य चहोकडून नेऊं लागले, विद्यावर्धक नवे नवे कारखाने घालूं लागले, व आपल्या उत्तम आणि रसाळ व्याख्यानांनीं युरोपियन लोकांवर छाप पडून साऱ्या हिंदुस्थानांत नावारूपास येऊं लागले ही किती उत्तम गोष्ट आहे! ईश्वरकृपेनें हा भरभराटीचा ओघ बडोदे संस्थानावर अक्षयी राहो. व इतर संस्थानीक त्याचा कित्ता घेवोत.

बडोद्यास इंग्लिश, मराठी, गुजराथी शाळा चालू झाल्या आहेत, व हायस्कुलें ही झालीं आहेत आणि हल्लीं तेथें कालेज स्थापन करण्याचा निश्चय होऊन गेल्या आठव्या तारखेस त्याचे पायाचा पहिला दगड बसविण्याचा समारंभ मोठ्या थाटाचा झाला हें सर्वांस कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो. राजा सर टी माधवराव दिवाण यांनीं बेतबात फार उत्तम ठेविला होता. ब्रिटिश सरकारचे एजंट मि. मेलविल साहेब, त्यांच्या पत्नी, आणि इतर पुष्कळ अधिकारी त्या समारंभास गेले होते कालेजाची इमारत रेलवे स्टेशनानजीकच मोठी भव्य बांधण्याचा विचार झाला आहे. तिला चार लक्ष रुपये खर्च करण्याचा ठराव झाला आहे. समारंभाचे आरंभीं दिवाण साहेबांनीं सुरस भाषण केलें. त्यांत विद्येची मोठी प्रशंसा करून बडोदें संस्थानांत तिचें पाऊल दिवसेंदिवस कसें पुढें पडत चाललें आहे तें दाखविलें. त्यांचें भाषण ऐकून सर्वांस मोठा आल्हाद झाला आणि त्यांनीं आनंदानें टाळ्या पिटल्या. मग पायाचे जागीं गेले. तेथें महाराज सरकारानीं दगडाखालीं आपल्या हातानें रुप्याच्या करणीनें चुना पसरला व त्यावर दगड ठेवून हातोडीनें दोन ठोके मारून तो पक्का केला. याप्रमाणें पायाचा समारंभ पुरा झाला. तेव्हां मि. मेलविल साहेबांनीं संतोष प्रदर्शित करून ह्मटलें कीं महाराज सरकार, या कालेजाचे योगानें आपले प्रांतांत इंग्लिश विद्येचा प्रसार विपुल होवो. व आपणास उमेदीचे वयांत या गोष्टीची आठवण राहून चिरकाल संतोष होवो. व विद्येचें काम आपले राष्ट्रांत अखंड चालो.

या नंतर त्याच दिवशीं दुसरा एक समारंभ झाला, तो बागेचा होय. महाराजांनीं या कालेजाजवळच एक सुंदर नवीन बाग केला आहे. त्याला पावणे दोन लक्ष रुपये लावण्याचा महाराजांचा निश्चय आहे. बागेंतही उत्तम शोभा केली होती. सर्व मंडळी तेथें जमल्यावर त्या बागेचे संबंधानें दिवाण साहेबांनीं भाषण केलें व तें संपतांच महाराज साहेब स्वतां उभे राहिले आणि त्यांनीं सर्व मंडळीची रजा घेऊन धीटपणानें इंग्रजी मध्यें भाषण केलें तें असें:—

मि. मेलविल साहेब, कुलीन स्त्रिया, आणि सभ्य गृहस्थहो, आपणा सर्वांस ताजी हवा, हिरवेंगार गवत, आणि सुंदर फुलें यांची आवड आहे. या मोठ्या शहरांत पुष्कळ लोकांचीं घरें एकास एक अगदी लागलेलीं आहेत, पुष्कळांस आपल्या घराशीं बाग लावण्याचें सामर्थ्य नाहीं, आणि असा मोठा बाग स्वतांचा करील असा कोणी श्रीमंत नाहीं. या करितां सर्व लोकांनीं मुलाबाळांसहीत या बागेंत थोडा वेळ हमेशा येत जावें आणि चांगल्या हवेचा उपभोग घेऊन हुशारीनें आणि प्रसन्न चित्तानें परत जात जावें. याजमध्यें हा तंबू आहे एवढा आह्मी आपले स्वतांचे उपयोगाकरितां ठेवून सर्व बाग आह्मी आपल्या प्रियकर लोकांस आणि सर्व प्रजाजनांस मोठ्या संतोषानें समर्पण करीत आहो.

महाराजाचें हें भाषण चित्तवेधक झालें व त्यांच्या हुशारी बद्दल आणि समयानुसार उत्तम भाषणा बद्दल सर्वांस अतिशय संतोष झाला व त्यांनीं आनंदानें टाळ्या फार वेळ वाजविल्या.

महाराजाने भाषणांत उच्चार व स्वराघात जसे असावे तसे होते. ही इंग्लिश विद्येची त्यांना देणगी मि० इलियट सा० आपल्या वऱ्हाडांतील माजी डजुकेशनल इन्स्पेक्टर जे हल्लीं त्यांचे शिक्षक आहेत त्यांची होय. व याकरितां त्यांचीही तारीफ केली पाहिजे.

नंतर पान सुपारी, अत्तर गुलाब, हार तुरे होऊन मंडळी घरोघर गेली.

## श्री० थोरले माधवराव पेशवे यांचें भाषण.

(मागील अंकावरून पुढें चालू)

याप्रमाणें त्या वेळच्या लढाईची आठवण झाली ह्मणजे आवेश येतो, बाहू स्फुर

ण पावतात, मनाची गति ह्या स्थळावर जाऊन पोचते पण तुह्मा मंडळीकडे अवलोकन केलें ह्मणजे लागलीच विस्मय वाटतो! हात पाय गळून जातात, देहभान नाहींसे होतें आणि अश्रु लोटतात. हे आपण सर्व सभाजन बसला आहा, यांतून कोणाला या लढाईचा उपसर्ग लागला नाहीं किंवा कोणाच्या घरचा वीरपुरुष बळी गेला नाहीं असे थोडेच असाल. हे महादजी बावा शिंदे बसले आहेत यांच्याकडे पहा! यांना कसा आवेश आला आहे, आणि यांचा चेहरा मोहरा कसा बदलून गेला आहे! यांचा बंधू महावीर जनकोजी शिंदा वीस वर्षांचे वयाचा घायाळ होऊन मलमा शिबीत बसला असतां अबदालीनें धरून नेऊन कापून टाकिला! हा गारद्याचा छोटा सेनापति पहा! याचा बाप प्रतापी इब्राहिमखान शत्रूनें हाल करून मारिला! हे मोरोबा फडणवीस पहा! यांचे वडील बाबुराव तंबूतल्या तंबूत ठार मारून टाकिले! आमचे समशेरबहादर, ज्यांच्या समसेरीच्या प्रभावावरून त्यांना बहादर किताब मिळाला-तो समरांगणीं विजेप्रमाणें चमकत असतां १००० शत्रुसैन्याचा त्यानें फडशा पाडला, या गाढ्या वीराच्या शरीरावर ६० वार झाले होते त्यांतच त्याचा अंत झाला! हे पवार बसले आहेत. यांचे तीर्थरूप यशवंतराव मोठी मर्दुमकी करून यजमानाबरोबर देह ठेविते झाले! तसेच हे बुंदेले, यांचे गोविंदपंत मारले गेले! हे माणकेश्वर, यांचे अंताजीपंत कळाच्या तोंडीं गेले! हे मेहेंदळे यांचे बळवंतराव धारातीर्थीं गत झाले! याप्रमाणें ज्या ज्या बाजूकडे नजर टाकावी तिकडे तिकडे लढाईत नाश पावलेल्या वीरांचे बंधु, पुत्र, पुतणे, भाचे असेच सर्व दिसत आहेत. हे होळकर मल्हारराव, हे गायकवाड दमाजी राव, हे राजे बहादर आणि विंचूरकर हे चौघे स्वतां पानपतवर लढाईत होते! यांना यांच्या पराजयाबद्दल किती दुःख होत असेल! हें कोणाला सांगावयाला नको. याप्रमाणें या दरबारांतील प्रत्येक गृहस्थास, त्याच्या घराण्यास, त्याच्या माल मत्तेस, सुखास, अब्रूस आणि जिवास पानपतच्या लढाईनें चटका लागला आहे. तशीच आमची स्वतांची अवस्था आहे. खुद्द या पेशव्याच्या घरचे तीन पुरुष पानपतावर नष्ट झालेले आहेत. दोघे काका आणि तिसरे बंधू. तसेच वडीलांचें निधनही या लढाईच्याच पायीं झालेलें आहे. असो! कोणी कोणी असें ह्मणतात कीं या पराजयाला कारण भाऊसाहेबांचा हेकड पणा, दुराग्रह आणि अभिमान. त्यांनीं सरदार लोकांनी सल्ला ऐकिली नाहीं; हें कितपत खरें असेल तें असो. पण या गोष्टीचा आतां विचार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, गोष्ट घडून पार झाली आणि भाऊसाहेबही जगून माघारे आले नाहींत. तेव्हां त्याचा विचार आता नको आहे. आतां आपणा सर्वांच्या शांतवनास काय ते आह्मीच आहो. आह्माकडे पहा, आमचा अभिमान धरा, आमचा हा पेशवा असें ह्मणा. पोट आणि अवयव यांच्या परस्पर संबंधाप्रमाणें आपला व आमचा संबंध आहे. आपण सर्व एकचित्त आणि दृढनिश्चयी असलों ह्मणजे थोड्याच दिवसांत हें दुःख विसरून जाऊ. सर्पानें दंश करून मूल मारलें तें तर मेलेंच पण नंतर त्या सर्पाला आपण मारलें ह्मणजे दुःखाचा थोडाच प्रतिकार होतो. तसें या दुष्ट अबदालीरूपी पक्षकानें आपल्या हजारो वीरांस मारलें आहे तर आपणी त्याच्या काबूल कंदाहारावर जाऊं. सर्व गिलचे लोकांचा नरमेध करूं त्यांच्या देशाला आग लावून राखरांगोळी करूं आणि या अबदालीला धरून आणून या आपल्या वाड्याच्या दरवाज्या पुढे [illegible] ळावर चढवू अशी आपण उमेद धरली पाहिजे. उदास होऊ नका, दुःख करू नका, स्वस्थचित्त व्हा, सिद्धता करा हा माधवराव तुमच्या सुखाचा भुकेला आहे. तुमच्या प्रेमाचा बंदा आहे. आणि तुमच्या कल्याणाचा निशिदिनीं भारग्राहक आहे. ह्मणून आज आनंदाचा दिवस आपण आणिला आहे तर आपलें सर्वांचें दुःख आजपासून संपलें असें समजा. आतां थोडे दिवस आपण विसावा घेऊ, देशांत स्वस्थता करू आणि आपल्या कार्योद्देशास लागू.

पु. बा.

## वऱ्हाड.

रा० रा० लक्ष्मणशास्त्री चिपळूणकर बी. ए. यांस एथील मिडलक्लास स्कुलावर हेडमास्तर नेमिल्याप्रमाणें ते बुधवारीं एथें येऊन गुरुवारीं आपले कामावर रुजू झाले. रा० रा० गोविंद नारायण चिकोटी यांस उमरावतीस हायस्कुलांत शेवटच्या असिस्टंट मास्तरचे जागेवर नेमिलें आहे त्याप्रमाणें ते जाणार, व त्यांनीं ४ महिने काम चांगलें केलें आणि मुलांस ममतेनें वागविलें ह्मणून मुलांनीं गुरुवारीं सायंकाळीं त्यांस पानसुपारीचा बेत शाळेंत केला होता.

उमरावतीस ११ वे तारखेस दरबार झाला त्या वेळीं मे. जोन्स साहेब कमिशनर यांनीं तेथील हायस्कुलाच्या चांगल्या निकालावरून असें भाषण केलें कीं "एथील शाळेंतील विद्यार्थ्यांनीं जें यश मिळविलें तें फक्त वऱ्हाडांतल्या विद्यार्थ्यांतच मिळविलें नाहीं, तर मुंबई इलाख्यांतील नावाजलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांसी टक्कर मारण्याला ती समर्थ झाली, याकरितां आपण सर्वांनीं मि. विष्णु मोरेश्वर महाजनी व त्यांचे असिस्टंट यांची तारिफ केली पाहिजे."

उमरावतीसही अकोल्याप्रमाणें चांगलीं कामें करणारे लोकांना ११ वे तारखेस दरबार भरवून कमिशनर साहेबांनीं बक्षिसें व सर्टिफिकेटें दिलीं.

क्या० सी टी लेन साहेब डिसेंबरचे ११ वे तारखेपासून मेजर झाले.

क्य० आर एस थांपसन साहेब डिसेंबरचे ११ वे तारखेपासून मेजर झाले.

क्या० रेनीक साहेब इलिचपुरचे असिस्टंट कमिशनर यांस दिवाणी कायद्याचे ३१४ व ३१९ कलमांतील अधिकार दिले.

वऱ्हाडांत रेलवे माजिस्त्रेटची नेमणुक होती ती कमी केली. आणि असें ठरविलें कीं ज्या ज्या रेलवेच्या भागावर गुन्हे होतील त्या त्या ठिकाणच्या युरोपियन माजिस्त्रेटनें त्याची चौकशी करावी. व जेथें असा युरोपियन माजिस्त्रेट नसेल तेथें नजीकच्या एकाद्या युरोपियन फुलपावर माजिस्त्रेटकडे ते गुन्हे जुडिशियल कमिशनर साहेबांनीं पाठवित जावे असा रेसिडेंट साहेबानीं ठराव केला.

घाटबोरीचा सब रजिष्ट्रार कमी केला व तेथील काम मेहकर सब रजिस्ट्रारकडे दिलें.

चिखलीचे थर्ड ग्रेड तहशिलदार मि. सादत मीरखान यास मि. इनायत हुसेन यांनीं ता. १९ अक्टोबर रोजीं पेनशनाचा अर्ज दिल्यापासून सेकंड ग्रेड तहशिलदार केलें आहे.

बाळापुरास रा. रा. गोविंदराव यशवंतराव तहशिलदार यांचे जागीं पोलिस इन्स्पेक्टर मि० सफदरअल्ली यांस नेमिलें व त्यांचे जागेवर रा. रा. रामजी शाळिग्राम यांस नेमिलें

रा. रा. अनंत विष्णु भागवत यांस डिपुटी कमिशनर आफिसांत २० रुपयाची कारकुनीची जागा मिळाली. हे चांगले हुशार असून इंग्लिश जाणणारे आहेत. दोन वेळां इंग्लिश भाषेंत वकिलीची परीक्षा देण्याकरितां हे मुंबईस गेले होते त्यावरून यांची योग्यता सर्वांस सहज दिसून येईल.

रा. रा. केशवराव महिपत खारकर ए. अ. कमि. उमरावतीस गेले होते ते सोमवारीं परत आले. त्यांना दिवाणी फौजदारी अधिकार देण्याविषयीं जु. क. सा.कडून रेसिडेंट सा.कडे लिहून गेलें आहे.

रा. रा. बळवंत नृसिंह मुधोळकर इलिचपुरचे डिपुटी इ. इन्स्पेक्टर यांनीं ३ महिन्याची रजा घेतली आहे व ते व्यंकटेशाचे गिरीकडे जाणार आहेत. त्यांचें आफिसकाम रा. रा. केशव ब्रह्मगिरी मास्तर यांजकडे सोपविलें आहे व त्या जिल्ह्यांतील सर्व शाळा इन्स्पेक्टर यांनीं पहाव्या असें डायरेक्टर साहेबांनीं ठरविलें आहे.

थंडीचें मान गेल्या आठवड्यांत कमी होत चाललें होतें पण संक्रांतीपासून ती पुन्हा चांगली पडूं लागली आहे. रोगराई कांहीं नाहीं. हवा रमणीय आहे. फार थंडीनें कपाशीची वेचणी मागसली आहे.

बाळापुर (मित्राकडून)—तारीख ९ जानेवारी रोजीं संध्याकाळीं रा० रा० गोविंदराव यशवंतराव तहशिलदार व त्यांचे तिघे बंधू या दिवशीं त्यांस भेटण्यासाठीं आले होते. त्यांस एथील इ. म. शाळेंत पानसुपारी झाली. प्रसिद्ध रीतीनें आदर सत्कार करून गोविंदरावजीस मानपत्र द्यावें असा कित्येकांचा विचार होता. परंतु तो, ही गोष्ट कायद्याप्रमाणें करतां येत नाहीं, ह्मणून रहित करून फक्त पानसुपारीस बोलाविलें. त्या दिवशीं मोहरमच्यातें माशाकरितां तालुक्यांतील बहुतेक गांवचे लोक सहजच आले होते तेव्हां समाज शेंदीडशांहून ज्यास्त जमला होता.

पहिल्यानें एथील हेडमास्तर यांनीं गोविंदरावाविषयीं चार शद्ब बोलतांना त्यांच्या सुस्वभावाविषयीं व कामाच्या संबंधानें गोर गरिबांच्या हिताविषयीं व कल्याणाविषयीं ते किती लक्ष देत असत याविषयीं व एकंदरीतें त्यांच्या चांगुलपणाविषयीं बोलून दाखविलें. नंतर रा. रा. यशवंतराव मास्तर यांनीं लिहून आणलेला मजकूर मंडळीस ऐकविला. तहाशिलदार यांनीं राजा जयशिंग याची छत्री व किल्ला यांची दुरुस्ती करवून सार्वजनीक कामाचें अखंड नाव राखिलें व त्यांच्या जाण्याच्या योगानें सर्वांस फार वाईट वाटलें याविषयीं त्यांत दिग्दर्शन होतें. हे झाल्यावर गोविंदरावजींनीं उठून उत्तर दिलें व सर्वांचे आभार मानिले.

गोविंदरावजी एथून जाण्याच्या पूर्व दिवशीं बहुतेक संभावीत लोकांच्या निमंत्रणावरून पानसुपारीस व त्यांच्या भेटीस गेले होते.

सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांच्या कामाच्या संबंधानें उत्तम मतें दर्शविलीं आहेत. व गोविंदरावजीस अनेकांपासून उत्तम दाखले मिळाले आहेत. आतां ते दुसऱ्या ठिकाणीं बदलून गेले आहेत तेथेंही त्यांस यश मिळो असें आह्मी इच्छितों.

या भरलेल्या सभेंतच शाळेंत तालिमखाना करण्याविषयीं वाटाघाट होउन त्याच बैठकीस ९३ रुपयाचे आकडे पडले. व तहाशिलदार यांनीं ५ रुपये दिले.

## वर्तमानसार

कंदाहार—अफगाणीस्थानांतील कंदाहार शहर इंग्लिश फौजांनीं बिनहरकत जाऊन सर केलें. आतां पुढें हिरातावर चाल आहे.

मुंबईस २८वे तारखेस युनिवर्सिटीचें कानव्होकेशन भरणार.

पुण्याचे स्मालकाज जडज रा. ब. मदन श्रीकृष्ण यांनीं रजा घेतली आहे याकरितां त्यांचे जागेवर हायकोर्टांतील वकील रा. रा. पांडुरंग बाळिभद्र यांस नेमिलें.

मुंबईत गेल्या आठवड्यांत नरसी केशवजींचें दिवाळें निघालें. या आठवड्यांत वनजिवनदास बल्लभदास नावाच्या व्यापाऱ्याचेंही दिवाळें निघून तो दमणकडे पळून गेल्याचें वर्तमान आलें आहे.

गोवे व इंग्रज सरकारचा मुलुख यांच्या दरम्यान रेलवेचा रस्ता बांधण्याविषयी पोर्तुगाल व इंग्रज सरकार यांजमध्यें तह झाला असें पोर्तुगालच्या राजानें बोलून दाखविलें.

कलकत्यांत कलाकौशल्याचें प्रदर्शन चालू आहे, त्यांत मुंबईहून एक, मद्रासेहून दोन, व बंगाल्यांतून तीन नेटिव ग्रहस्थांनीं तसबिरा पाठविल्या आहेत.

गेल्या नावेंबर महिन्यांत मुंबईहून १,२९,१४३ रुपयांचे गहूं बाहेर देशीं जलमार्गानें रवाना झाले.

विलायतेस सर्वप्रकारचे व्यापारास फार मंदी आली आहे व त्यामुळें लोक काळजींत आहेत.

मि० गंगाधर अनंत भट एम. ए. एल. सी. इ. यांस मि० जे. ई. हारपरिंग सिविल इंजिनियर यांचे रिपोर्टावरून नीरा इरिगेशन एस्टाब्लिशमेंटांतून काढून पूर्णे इरिगेशनकडे मि० हडसन हर्ट यांचे हाताखालीं नेमिलें, व त्यांचें नांव इंजिनियरींग लिस्टांत असिस्टंट इंजिनियर थर्ड ग्रेडच्या जागेंत दाखल केलें जाऊन त्यांच्या संबधानें प्रत्येक तिमाहीस रिपोर्टही करीत जावा असा ठराव सरकारानें केल्याचें समजतें.

गेल्या मार्च महिन्यांत संपणाऱ्या वर्षांत विलायतचे फक्त मादक दारू वगैरे पदार्थांचे जकातीचें उत्पन्न ४० कोटि ९० लक्ष ७ हजार दोन शें ऐंशी रु० झालें असें एका पत्रांत लिहिलें आहे.

फ्रान्स देशांत १०३७ छापखाने आहेत व त्यांत ९९०० कंपाझिटर, ३०० प्रेसमन, ९०० शुद्धाशुद्ध करणार व ३५० देखरेख करणार आहेत.

अशिक्षित व जुलमी मारवाडी, लोकांपासून जबर व्याज घेतात म्हणून लोक त्यांचा फार तिरस्कार करितात; परंतु सुशिक्षित युरोपियन लोकांचाही आमच्या देशांत हा धंदा सुरू आहे हें कोणाचे लक्षांत नव्हतें. परंतु गिरण्यांचे नांवानें नरशी केशवजी यांणीं जें कर्ज काढलें आहे त्यांत एथील डाक्तर सिडनी स्मीथ यांणीं साडेचार लाख रुपये ९२ टक्के व्याजानें दिलेले आहेत हें ऐकून पुष्कळ लोकांस आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं.

नागपूर एथील उद्योग शाळेचें काम चांगलें चाललें आहे असें दिसतें. दरसाल या शाळेंतून कित्येक विद्यार्थी तयार होत असून त्यांस नोकऱ्या मिळत आहेत व स्वतःचे हिमतीवरही ते कामधंदा चालवीत आहेत असें समजतें. सन १८७७ सालीं या शाळेंत ११० मुलें होतीं. व यांत ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं कदाहूं मुलांचे संख्येंत मुके व बहिरे यांची संख्या बरीच असून एक अंध मनुष्य सुताराचें काम करण्यास शिकला आहे. तो लांकूड हातानें चांचपून पाहून काम करतो.

सिव्हिल सर्व्हिस परिक्षेचे वयाची इयत्ता वाढवावी व हिंदुस्थानांत परिक्षा घ्यावी असा कलकत्ता एथील ब्रिटिश इंडियन असोसिएशनानें सेक्रेटरी आफ स्टेट यांस अर्ज केला होता तो नामंजूर झाला.

युनिव्हर्सिटीच्या पदव्या देण्याचा समारंभ— सदहू समारंभ येत्या २८ व्या तारखेस होणार.

कोणाचाही सुधारलेल्या राष्ट्रांत प्रस्तुतच्या उद्देशाप्रमाणें अनान्वित दुराकर कोठें कधींही बसविण्यांत आला न-

टोल. इंग्लंडांत १,००० रुपया पेक्षां ज्याची सालीना प्राप्ति कमी असेल त्यांवर इन्कमटाक्स कधींही बसत नाहीं. इटाली देशांत कर फार आहेत असें म्हणतात, पण तेथें उदीमाइतके सारखे जुलमी कर बसविण्यापक्षां सरकार लुटही पत्करून रहातें. इं. प्र.

## भविष्य.

पूर्वी नाशिक क्षेत्रीं पुढें हजार [illegible] नंतर राम अवतार होईल म्हणून सांगितलें होतें आणि दक्षिण दिशेस कल्याण नांवाचें एक गांव आहे तेथें एक लिंग असून त्यामध्यें बगेश्वर महाराजानें पुढें हजार वर्षांनंतर इंग्रज सरकार येईल म्हणून भविष्य सांगितलें होतें. त्याप्रमाणें आजपर्यंत सर्व झालें. आतां एथून पुढें काय काय व कसें कसें होणार याजविषयीं मी एक भविष्य सांगतों. तें ऐका:—

आतां पुढें सोन्याचें व चांदीचें मोल कमी होईल. लोखंडाचें मोल जास्त होईल. व गवता पासून झालेलें अन्न आणि कापसापासून झालेलीं वस्त्रें दृष्टीस पडणार नाहींत. अखंड न शिवतां आणि शरीरा प्रमाणें वस्त्रें निर्माण होतील. तसेंच मृत्तिकेपासून अन्न निर्माण होईल. मग त्या अन्नवस्त्रापासून शरीर निरोगी होईल. व हें अन्न वस्त्र सुरू झाल्या नंतर मनुष्यांचीं आयुष्यें १३६ वर्षें पर्यंत रहाणार आहेत. दर तालुक्यास एक चूल होईल, दर घरास स्वयंपाक होणार नाहीं. गाईचें व म्हशीचे दूध मनुष्यें भक्षण करणार नाहींत. स्त्रीस ऋतु प्राप्त झाल्या बरोबर तिचे स्तनांतून दूध पडूं लागेल. व गर्भ नसला तरी पुरुष एकांत करते वेळेस दूध प्राशन करतील. ती स्त्री जोंपर्यंत जीवंत राहील तोंपर्यंत तें दूध खंड होणार नाहीं. व तीस कामधेनु असें म्हणूं लागतील.

हल्लीं जो व्यापार धंदा चालत आहे तो रहाणार नाहीं. खेती वाडी चालणार नाहीं. सर्व लोकांस बिगारी कामावांचून कांहीं एक रोजगार लागणार नाहीं. हीं घरें माड्या, हवेल्या रहाणार नाहींत. मनुष्यें पांच महिने समुद्र किनाऱ्यास रहातील. आणि पांच महिने ह्या देशांत रहातील. व दोन महिने जमीनींत रहातील. कोसाला एक दिवा होईल. रात्र आणि दिवस सारखा दिसूं लागेल. रात्रीं अंधःकार नाहींसा होईल.

आजपासून १३६ वर्षांनंतर वर लिहिलेलीं प्रकर्णें सुरू होतील. आणि त्याच वर्षी चैत्र वद्य ३० स्येस रात्रींचे १२ वाजतां आकाशांतील ताऱ्यास ग्रहणें लागतील. आणि तीं ग्रहणें तीन दिवस सारखीं रहातील. एक दिवस धूम्रवर्णासारखा फुगारा पडेल त्यास सोरा असें म्हणावें, दुसरे दिवशीं पिवळा वर्ण फुगारा पडेल त्यास गंधक म्हणावें. तिसरे दिवशीं काळा वर्ण फुगारा पडेल त्यास कोळसा म्हणावें. तीन दिवस सारखा अंधार पडून सूर्याचा प्रकाश अगदीं लोपून जाईल. रात्रीचे १२ वाजतां पृथ्वी भरून एक वीज लवली जाईल. नंतर तिचा भयंकर शब्द होईल. त्या शब्दा बरोबर राळ उडाल्या सारखी मोठी भयंकर ज्वाळा होईल. ह्या प्रचंड अग्नींतून जो वाचला जाईल त्यास कर्णावतार असें म्हणावें. ग्रहण पृथ्वीला रोग आहे असें समजावें.

जों पर्यंत पृथ्वी आहे तोंपर्यंत हेंच सरकार राहील. दुसरें होणार नाहीं. आजपर्यंत सरकार दयाळू होतें. एथून पुढें ईश्वरा सारखें तामसी होईल. खोटें कर्माबद्दल शिक्षा विंचवाचा डंक देतील. दुसरी मध्यावर ब्रह्मलिखित मुद्रा डागून काढील. तिसरी स्त्रियांला मिशा गोंदतील. रोगाबद्दल कायदा नेमून दर रविवारीं रोग येण्याचे पूर्वी सर्वत्रास औषधें मिळतील. उदाहरण पर्जन्य येण्याचे पूर्वी तलाव बांधण्याचा आरंभ केला पाहिजे तसेंच रोग होण्याचे पूर्वी नाडी पाहून औषधें देतील.

दक्षिण हिंदुस्थानामध्यें पूर्वी जसा नारद मुनीचा अवतार तसा एक फितुरी एक मनुष्य होऊन तो असा फितूर करून दाखवील कीं, राजा आणि प्रजा या उभयतांस संतोष करील. मग मनुष्यें व सरकार त्याचे विचारानें वागतील-

आतां पुढील भविष्यें सांगण्याचें झालें सर्व पूर्वी झालेलीं कांहीं वर्तमानें आतां थोडक्यांत एथें लिहितों. तें असें:—

सृष्टी निर्माण कर्ता ब्रह्मदेव झाल्यापासून सांगावें तर विस्तार फारच वाढतो. करितां थोडें घेतों. पूर्वी मनुष्यास वाचा नव्हती. मनुष्यास पुच्छ होतें. पुच्छ वाढण्याचें राहिल्यापासून वाच्या उत्पन्न झाली. ज्या मनुष्यास वाच्या फुटली त्यास शब्दब्रह्म म्हणूं लागले. शब्द ब्रह्माचे पुत्र ब्रह्मदेव झाल्यापासून नऊ अंकाचा मेळ घालून विद्या निर्माण केली. ब्रह्म पुत्र नारदमुनी यांनीं बत्तीस बाराखड्यांचा मेळ घालून दिवस, वार, महिने, वर्ष केलें. आजपर्यंत विद्येमध्यें कसर होती. हल्लीं इंग्रज सरकारानीं २६ अक्षरांवर मेळ घालून तारीख नेमून टाकली. आजपर्यंत पृथ्वी अज्ञान दशेंत होती ती इंग्रज सरकार आल्यापासून सुज्ञान दशेंत आली.

सर्वांस माझी प्रार्थना हीच आहे कीं, मी जें सांगितलें आहे तें खोटें मानूं नका. पृथ्वीमध्यें कोणी भविष्यवादी असतील तर त्यांनीं हें भविष्य नव्हे असें समजून तें खरें कोणत्या प्रकारें असावें हें वर्तमानपत्रांतून कळवावें, नाहीं पेक्षां मला सर्वत्रांनीं मदत करावी अशी प्रार्थना आहे.

भविष्य सांगण्याचें कारण पृथ्वीचा ऋतु बरोबर नाहीं मह्रे बिघडली आहे. यंत्र बरोबर चालत नाहीं. ग्रहणें वारंवार लागतात. उन्हाळा पावसाळा आणि हिवाळा अक्षयीं अभ्रांत फिरतो. आतां कोणाने वेळेस कोणता वायु सुटेल आणि कोणत्या प्रकारचीं पीडा होईल याचा नियम नाहीं. मनुष्याला ईश्वरानें कोणत्या कामा करितां निर्माण केलें आहे याचा विचार कोणी करीत नाहीं. भविष्यवादींनीं खरीं भविष्यें सांगितलीं असतां त्याचा योग्य बंदोबस्त करणार सरकार आहे. अक्षराला अक्षर जोडून सांगावें तर मला विद्याभ्यास नाहीं. मला नाव बसू असें म्हणतात रहाणार किल्ला कल्याण हल्लीं मुक्काम सोलापूर टिकाणा एकनाथाचें देवालय ह्या देवाची पूजा वगैरे मजकडे आहे. मल्हारपा विरासा महाराज रहाणार कसबा निलंगा हल्लीं मुक्काम किल्ला असे. त्यांचा उपदेशी मी आहे.

क. त.

## जाहिरखबर.

देण्यांत येत आहे कीं, मुलुक अमानी हैदराबाद एप्रील सन १८७९। ८० सालाचे सर्व प्रकारचे अबकारी, देशी दारू, ताडी, अफू आणि अमली पदार्थ यांचा लिलाव खालीं लिहिलेल्या तारखांस होईल. ताडी व देशी दारू याचा लिलाव निरनिराळा केला जाईल. प्रत्येक लिलाव डेपुटी कमिशनर साहेब यांचे कचेरींत १२ वाजतां होईल.

वणी जिल्ह्याचा—तारीख ६ माहे फेब्रुआरी सन १८७९ रोजीं.

उमरावती जिल्ह्याचा—तारीख ११ माहे फब्रुवारी सन १८७९ इसवी

इलिचपुर जिल्ह्याचा—तारीख २० माहे फब्रुवारी १८७९ रोजीं.

अकोले जिल्ह्याचा—तारीख २६ माहे फेब्रुवारी १८७९ रोजीं.

वाशिम जिल्ह्याचा—तारीख ३ माहे मार्च १८७९ इसवी रोजीं.

बुलढाणें जिल्ह्याचा—तारीख ११ माहे मार्च १८७९ इसवी रोजीं.

मक्तयाचे व लिलावाचे शर्तीची माहिती डिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींतून मिळवावी.

W. B. Jones

कमिशनर

हैदराबाद असाइन डिस्ट्रिक्ट

## NOTICE

We the undersigned beg respectfully to inform all our constituents, customers and the public of out-stations that our business hitherto carried on under the name and style of 'Messrs Bomanjee Ookerjee & Co has from the 13tu November 1878 been closed by mutual consent and all our contracts, estates and assets have been purchased and taken in his charge by Mr. Pstonjee Rustomjee our creditor.

Mr Pestonjee Rustomjee will henceforward and from the datted above specified conduct our business under the name and style of Messrs Pestonjee Rusmjee & Co.

All persons, departments and concerns indebted to our firm of Messrs Bomanjee Ookerjee & Co are hereby requested to pay the sums in which they are so indebted, to the said firm of Messrs Pestonjee Rustomjee & Co.

BOMANJEE OOKERJEE & Co.

Akola, 15th December 1878.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला, रविवार ता० २६ माहे जानेवारी सन १८७९ इसवी. अंक ४


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यात खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| राजकारणाच्या हकुमा | ०६ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी अफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| सावकारीचे नियम. | ०८ |
| कुटुंबयंत्री | ०६ |
| नवीन दिवाणी कायद्यावरील सर्क्युलरें | ०६ |

## जाहिरखबर.

देण्यात येत आहे कीं, मुलूक अगानी हैदराबाद एथील सन १८७९ । ८० सालचे सर्व प्रकारचे अबकारी, देशी दारू, ताडी, अफू आणि अमली पदार्थ यांचा लिलाव खालीं लिहिलेल्या तारखांस होईल व ताडी आणि देशी दारू यांचा लिलाव निरनिराळा केला जाईल. प्रत्येक लिलाव डिपुटी कमिशनर साहेब यांचे कचेरींत १२ वाजतां होईल.

वणी जिल्ह्याचा—तारीख ६ माहे फेब्रुवारी सन १८७९ रोजीं.

उमरावती जिल्ह्याचा—तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १८७८ रोजीं.

इलिचपुर जिल्ह्याचा —तारीख २० माहे फेब्रुवारी सन १८७९ रोजीं

अकोलें जिल्ह्याचा— तारीख २६ माहे फेब्रुवारी १८७९ इसवी रोजीं.

वाशिम जिल्ह्याचा—तारीख ३ माहे मार्च १८७९ इसवी रोजीं.

बुलढाणें जिल्ह्याचा — तारीख ११ माहे मार्च सन १८७९ रोजीं

मक्तया चे व लिलावाचे शर्तींची माहिती डिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींतून मिळवावी.

W. B. Jones
कमिशनर
हैदराबाद असाइन डिस्ट्रिक्ट

## नोटिसा.

हुकूमचंद वल्लद हिराचंद मारवाडी दुकान मौजे घोडप चेडछ्याची प्रगणे रिसवड तालुके वाशिम जिल्हे मजकूर यास केशवराम भुरमल मारवाडी दुकान मौजे एकलासपुर प्रगणे रिसवड तालुके वाशिम यानकडून देण्यांत येते कीं, तुमचा व आमचा भाग एके दुकानांत असून दोघाची शराकत होती अदमासें अडीच वर्षें झालीं तुह्मी आमचें नाव काढून टाकलें व आपलें नांव फक्त दुकानांत ठेविलें. ज्या वेळीं आमचें नाव काढून टाकलें त्यावेळीं आह्मास सांगितले कीं हिशेब करून तुमची नफ्याची रकम देऊं व तुमची आमची पावती फारकत करून टाकूं. कांहीं दिवसांनीं आमचे पुढें घर जळालें तेव्हां माझे सर्व कागदपत्र जळाले हें तुह्मी मनांत आणून बेमानी केली व अद्यापपावेतों दुकानचा हिशेब देत नाहीं. व पावती फारकत करीत नाहीं. व आमचे मालकीची रकम देत नाहीं आणि हिशेब दाखवित नाहीं. याजकरितां तुह्मास जाहिर करितों कीं, आह्मी आपला हिस्सा सोडणार नाहीं व दुकानांतून नावही काढणार नाहीं याज करितां तुह्मास जाहिर करण्यांत येते कीं, तुमचा व आमचा जो कांहीं तंटा आहे तो आपसांत ही नोटिस पावल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत निकाल करावा. नाहीं तर रीतीप्रमाणें दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुध्दां पैसा घेतला जाईल. कळावें. तारीख १२ माहे ज्यानेवारी सन १८७९ इसवी.

[ सही ] केशवराम भूरमल मारवाडी दस्तुर खुद्द.

### नोटिस.

पुंजाजी वल्लद रामजी सातव रहाणार बसाडी तालुके मलकापुर यांसी कडतु वल्लद मानाजी सातव रहाणार लाखणवाडा याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मांपासून ८९ रुपये रोख सुर्ती शके १७९९ च्या कार्तिक माशी घेतले त्याचा करार १५ दिवसांनीं उसनवार द्यावे. व पुढें राहिल्यास कर्जाऊ रकम समजून व्याजासुद्धां द्यावें. त्याप्रमाणें तुह्मी १५ दिवसांत रकम दिली नाहीं आज चौदा महिने झाले सबब आमचे रकमेची आह्मांस हल्लीं जरूर आहे याज करितां मुद्दल रुपये ८९ व दरमहा दर रुपयास अर्धा आणा प्रमाणें व्याज यासहित सर्व रकम नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आणून द्यावी. न दिल्यास तुह्मावर फिर्याद करून खर्चासुध्दां सर्व रकम घेण्यांत येईल. व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. तारीख २३ माहे जानेवारी सन १८७९ इसवी.

(सही) कडतु वल्लद मानाजी सातव याचे हातचा नांगर.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### पुढें आपली गत कशी होईल?

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. महाराज, सदरील प्रश्न मोठा विचारणीय आहे. व्यवहारांत उमेद आहे तोंपर्यंत जरी याजविषयींचा विचार स्तब्ध असतो तरी तो काल लोटल्यावर व आयुष्याच्या पायरी वरची मजल आली ह्मणजे मग बहुत लोक याचा विचार करणें सुरू करितात; तें कसेंही असो. मला आतांच याविषयीं जें वाटतें तें ईश्वरापुढें प्रार्थनारूपानें सादर करितों. आपणास पसंत वाटल्यास पत्रांत यास स्थल द्यावें.

श्लोक.

बहुत दिनस झाले वाटतें देवदेवा ।
करिन तव पदाची शक्य जी होय सेवा ॥
परि मज गुण विद्या ज्ञान कांहीं असेना ।
कशि तरि गत माझी होय देवा कळेना १
त्रिविध कठिण तापें तापलों जाच होतो ।
अतुल मज अनंता वर्णवेना अहो तो ॥
निशिदिन मन कामीं कामना आवरेना ।
काशी तरि गत माझी होय देवा कळेना २
अघटित तव माया वर्णितां वर्णवेना ।
हरि हर विधि गाती त्यासही अकळेना
स्थिर मन न कधीं जें इच्छितें सौख्यनाना
काशि तरि गत माझी ० ॥ ३ ॥
किति शत रवितेजीं काजव्याचा उजेड
अणुकण महिसींगे तोलितो कवि जोड ॥
नदिपति टिटवा वा शोषितो हें घडेना
कशि तरि गत माझी ० ॥ ४ ॥
अविट तव पदांतें सोडुनी सैरवैरा;
हुडकित फिरतों हा भूतजाती पसारा
किती तरि निज दुःखें सांगु तीं बोलवेना
कशि तरि गत माझी ० ॥ ५ ॥
निजहित करणें जें इष्ट सोडोनि सारें
हर ! हर ! छळितें मी प्राणिया दुर्बळातें
फट फट निजगर्वे बोलतों मी परांनां
कशि तरि गत माझी ० ॥ ६ ॥
खळ खट कुमती जे आवडे संग त्यांचा
सुजन कुशल सांगे त्रास होतो तयाचा
अहह ! विषयवांछा कांहि केल्या सुटेना
कशि तरि गत माझी ० ॥ ७ ॥
गृह धन सुत दारा हेंचि कैवल्य वाटे
भ्रमुनि मन तयांना मानितें तृप्त खोटें
ह्मणुनि विनवितों मी जोडुनी या करांना
कशि तरि गत माझी होय देवा कळेना ८

ग. ब.

### मनुष्यांना मुख्य कर्तव्य काय?

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस वि. वि.

या सृष्टींत जे प्राणी निर्माण आहेत त्यां सर्वांस आहार अगदी अवश्य असला पाहिजे. आतां प्रत्येकास निरनिराळे प्रकारचा आहार चालतो ही वेगळी गोष्ट, पण कोणते तरी प्रकारचा आहार घेतल्याशिवाय त्याचें कधीं चालणार नाहीं, हें तर कोणीही कबूल करील. आतां आपले मनुष्य जातीच्या प्राण्याचा मुख्य आहार ह्मटला ह्मणजे अन्न होय. अन्नवाचून आपलें कधीं चालणार नाहीं. इतर कांहीं प्राण्यांकारितां जसे नानाप्रकारचे जिन्नस ईश्वरानें उत्पन्न करून ठेविले आहेत तसे मनुष्याकरितां अन्न उत्पन्न करून ठेविलें नसून केवळ ते मनुष्यांनीं मेहनत करून उत्पन्न करावें यावर अवलंबून आहे पण तें उत्पन्न करणें जसे मनुष्याकडे ठेविलें तसेंच मनुष्यांमध्यें तें उत्पन्न करण्याचें ज्ञानही ठेविलें आहे. मग मनुष्यांस अडचण ती कोणती ? मनुष्यें आपले आळसानें किंवा भिमेपणानें तें उत्पन्न न करतील तर यांत दोष कोणाकडे? ईश्वराकडे नाहीं, कारण त्यानें आपणास ज्ञान, शक्ति, आणि बीजें हीं दिलीं आहेत.

पण आतां आयते पदार्थ बाजारांत मिळतात मग आपणास ते उत्पन्न कशाला केले पाहिजेत? कांहीं करण्याची जरूर नाहीं. शेत घरीं करून काय फायदा एक दोन बैल पाळा, गडी ठेवा, त्याचे (शेतीसंबंधीं) सामान आहे कीं नाहीं तें पहा, बी बाळगून ठेवा, शेत नांगरा, कुंदा काढा, खत घाला इतकी पंचाईत करा, त्यापेक्षां नक्त वरचेवर फेंकावे धान्य घ्यावें आणि स्वस्थ बसावें. आपल्याला पगार मिळतोच आहे. चैन मारू एकट्यांत पण असे सुखी चैन मारणारे लोकहो, थोडीसी पाठीमागें दृष्टि करा. तुमचे वडील शेतीवरच होते. आपण शेतीच आहों. कसहो आपण शेतीच आहो? नाहीं. आपण व्यापार किंवा चाकरी का ह्मणाना? होय. मी ह्मणतों. पण मला सांगा? आपण व्यापार धराना? होय धरला. तो कशाचा करणार? समुद्रांतील रेतीचा? कीं काळे मातीचा? कीं काळे दगडांचा? कांहीं नाहीं. अहो हे सर्व चोचले आहेत. खावयास असलें ह्मणजे पुढले सर्व प्रकार आहेत. अशी कल्पना करूं कीं प्रथम एकानें शेत केलें. त्यांत त्याला धान्य उत्पन्न झालें हें त्याचे उदर निर्वाहास दुसरे धान्य दुसरें वर्षीं होईपर्यंत पुरून राहिलें तर तें कोणते तरी कारणानें तो खर्च करील. ह्मणजे मोबदला करील. आणि मोबदला हाच व्यापार. मग धान्यापासून उत्पन्न झालेला जो व्यापार तो मोठा कसा ह्मणावा? दुसरें नोकरी ह्मणजे आपले गुणाचा उपयोग दुसऱ्यास द्यावा आणि आपण आपले उपयोगाचा पदार्थ घ्यावा तर हाही मोबदलाच आहे. तेव्हां व्यापाराचीच समवयस्क जी नोकरी ती या दोहोंची माता जी शेती तिची बरोबरी कशी करील? कधीं करणार नाहीं. तेव्हां शेती हीच आपण आहों आणि तिचा अनादर कोणी करूं नये. कारण उत्पत्ति, स्थिती, शक्ति, ज्ञान, विद्या साध्य कर

वयास मुख्य बीज तें अन्न उत्पन्न करणारी तीं शेती होय कळावें हे विनंती.

ग. ब.

वऱ्हाडसमाचार

मिति माघ शुध्द ४ शके १८००

## वैनाद एथील सोन्याच्या खाणी.

मद्रास इलाख्यांत वैनाद ह्मणून एक प्रांत आहे तेथें सोन्याच्या खाणी आहेत त्यांतून कांहीं काळामागें आमचे लोकांनीं सोनें काढिलेलें आहे. परंतु अशा मोलवान खाणी उत्तम रीतीनें उपयोगास आणण्यास आमच्या लोकांत चातुर्य कमी, यांत्रिक साधनें कमी, व कंपन्या जमवून बहुत भांडवल एकत्र करण्याची सहायता कमी यामुळें आज पर्यंत त्या खाणींतून निघावें तसें सोनें निघून आमचे लोकांस विशेष लाभ झाला नाहीं. आमचे मजूर वगैरे लोक खाणींतील माती व जवळ पासचे नद्यांतील वाळू गाळून झारेकऱ्या प्रमाणें सोन्याचे रज काढीत ते किरकोळ विकून उदरनिर्वाह करीत. पुढें त्या लगत्यास काफीच्या लागवडीचे युरोपियन कंपन्यांचे कारखाने किस्नेक झाले व तिकडे या लोकांस मजूर काम काम मिळू लागलें तेव्हां त्यांनीं तें काम सोडून दिलें. हल्लीं त्या खाणींचा उदयकाळ आला आहे असें दिसतें. आस्त्रेलिया देशांत सोन्याच्या खाणी आहेत. तिकडील उत्तम माहितगार कित्येक लोक इकडे येऊन त्यांनीं या सोन्याच्या खाणींविषयीं विशेष शोध केला. व त्यांचीही आतां खात्री झाली आहे कीं, वैनादच्या खाणी चांगल्या फलद्रूप होतील. व तेथील सोनें आस्त्रेलिया पेक्षां चांगलें आहे. त्यामुळें लहान मोठ्या कांहीं कंपन्याही या कामासाठीं विलायतेंत उभारण्याची खटपट चालली आहे. व सरकारचेंही लक्ष तिकडे लागलें आहे. मद्रास सरकाराकडून मि० स्मिथ आणि मि. लेग असे दोन गृहस्थ या खाणींचा तपास करून रिपोर्ट करण्याविषयीं नेमिले आहेत व त्यांकडून रिपोर्ट येऊन ते प्रसिद्द होत आहेत त्यांवरूनही दिसतें कीं या खाणींतून सोनें काढण्याचें काम चालवावें अशी यांची फलद्रूपता आहे. तेव्हां विलायतचे उद्योगी व धनवान लोक हा उद्योग चालू करण्यास पुढें सरसावतील यांत संशय नाहीं.

पहा ! आमच्या देशांत पुष्कळ सोनें असून तें आह्मांस प्राप्त करून घेतां येत नाहीं. ते परदेशचे लोक काढून नेणार व आह्मी त्यांचे कारखान्यांत मजुराचें काम करणार. यावरून इतकेंच दिसतें कीं शहाणपण व साधनें यांवाचून सर्व व्यर्थ आहे. दयाळु परमेश्वरानें आह्मांस वैनादकडे सोन्याच्या खाणी दिल्या आहेत, गोवळकोंड्याकडे हिऱ्याच्या खाणी दिल्या आहेत, लंकेकडे मोत्यांचा समुद्रकांठ दिला आहे, पण हीं सर्व उंटाचे पाठीवरील सुग्रास अन्नाप्रमाणें आह्मांस झालीं आहेत. उंटास त्या अन्नाची चवन कळून तो वाटेंतील काटेरी बाभळीच खात सुटतो तशी आमची प्रस्तुत अवस्था आहे ! नशीब !

## विलायतेंतील वर्तमान पत्रांचें मोल.

विलायतेंतील लोकांच्या शहाणाची व चातुर्याची इतकी पराकाष्ठा आहे कीं ते जें काम हातीं धरतात तें शिखरास पोंचवितात. यामुळें सर्वच कारखाने तिकडे उत्तम चालतात. वर्तमानपत्रांची रुचीही तिकडे पराकाष्ठेची आहे. व त्यांचें मोलही लोक अत्यंत समजतात असे पुढें लिहिलेल्या अकड्यावरून आमचे वाचणारांचे सहज लक्षांत येईल.

लंडन टेलिग्राफ ह्मणून विलायतेंत वर्तमान पत्र आहे त्याच्या विक्रीची गोष्ट निघाली होती तेव्हां कोणी ८९ लक्ष रुपयांस तें विकत मागितलें, पण त्याचे मालक मेसर्स लासन लेवी आणि कंपनी यांनीं एक कोट रुपये घेऊं, त्या खालीं देणार नाहीं असें सांगितलें ह्मणतात. टाइम्स ह्मणून जें तेथें नामांकित पत्र आहे त्याचें अंदाजानें मोल पांच कोटि रु. करितात. स्ट्यांडर्ड पत्राचें २ कोटि आणि डॅलिन्यूजॅ पत्राचें १ कोटि २० लक्ष रुपये करितात.

टाइम्स पत्राच्या नित्य ६५००० प्रति छापून वाटल्या जातात. डेलिन्यूजच्या १ लक्ष २५ हजार, स्ट्यांडर्डच्या १४५००० आणि टेलिग्राफाच्या २ लक्ष प्रति नित्य छापतात.

टाइम्स पत्राला जाहिरातीचें जें उत्पन्न आहे तें बाकीच्या सदरील तीन पत्रांच्या उत्पन्नाच्या एकंदर बेरजेहून अधिक आहे. स्ट्यांडर्ड पत्राला डेलिन्यूज आणि टेलिग्राफ यांहून जाहिरातीचे उत्पन्न अधिक आहे आणि डेलिन्युज यास टेलिग्राफाहून अधिक उत्पन्न आहे.

यावरून विलायतेंतील वर्तमानपत्रांची संपत्ती केवढी आहे, व त्या मानानें हिंदुस्थानांतील आमचीं नेटिव पत्रें किती भिकारी आहेत तें पहावें! आमचे देशांतील बहुतेक पत्रांचे वर्गणीदार शेकड्यांनीं मोजावयाचे कित्येकांचे तर दशकांनीं मोजांत असतील व आमच्या देशांतलि वर्तमान पत्राच्या कारखान्याची दौलत हजारांनीं गणू लागल्यास एकदा मिटलेलीं बोटें पुन्हा उघडण्यास फार थोड्यांच्याच गणतींत प्रसंग यावयाचा! इतके आह्मी हिंदुस्थानांतील पत्रकर्ते श्रीमान आहों! धन्य आमची!

हिंदुस्थानदेश विद्वान झाला, पुष्कळ पुढें गेला, असें जे कोणी ह्मणतात त्यांनीं या एकाच गोष्टींत विलायतचें व हिंदुस्थानचें केवढें महदंतर आहे तें पाहावें !

## विलायतेंत विपत्ति.

आमच्या देशांत दरिद्र फार ह्मणून इकडेच वरचेवर विपत्तीचे प्रसंग येताहेत, व संपत्तिमान देशांत ते येत नाहींत, असें नाहीं. ईश्वराच्या अवकृपेचा सपाटा चोहोकडे चालूच आहे. नुकतीच विलायतची डाक आली तींतून खालील गोष्टी आमचे वाचण्यांत आल्या.

साऱ्या देशांत हाल अपेष्टेचे प्रसंग आलेले प्रसिद्धीस येत आहेत. शेफील्ड एथें ६०००० रु० फंड जमविला आहे. व विपत्तिग्रस्तांस अन्नवस्त्र देण्याचें काम उदार लोकांकडून चालू झालें आहे तरी रिलीफफंड कमिटीला मजूरदार लोकांच्या दुःखदायक स्थितीचा बदल करणें फार अवघड झालें आहे. बिर्मिंगहाम शहरांत कहर उसळला आहे त्याचे निवारणार्थ सभा भरून वर्गणी जमविण्याचा विच्यार झाला. बार्किनहेड, हानली आणि किडरमिनिस्टर एथेंही अशाच कारणासाठीं सभा भरल्या होत्या. अस्टन, अडरलिन आणि सौथांपटन ऐथेंही सभा भरल्या होत्या. उलवर हांपटन एथेंही लोकांस सहाय्य करण्यासाठीं तजवीज चालू आहे. वेस्ट इंग्लंड ब्यांकेचें दिवाळें निघाले त्यांतील भागीदार लोकांच्या दुःखनिवारणासाठीं एक्झेटर एथें मेयर यांनीं सर्व लोकांची सभा भरविली. त्या ब्यांकेच्या दिवाळ्यानें हाजारो लोकांच्या तोंडास पानें पुसलीं. प्रेस्टन, न्युक्यासल. लेसेस्टर, चेस्टर, सौथपोर्ट आणि दुसरे कित्येक गावांतून लोकांचे फार हाल आहेत, व त्यांस सहाय करण्याच्या तजविजी चालू आहेत. साहु सावकार लोकांस धक्का बसला आहे. व गोरगरीबांचे हाल होत आहेत. त्याविषयीं चौकशी करण्यासाठीं व उपाय योजण्यासाठीं पार्लमेंट सभेनें एक कमिटी नेमावी ह्मणून तिला म्यांचेस्टरचे लोकांनीं सभा भरवून अर्ज करण्याचा ठराव केला.

स्काटलंडाकडूनही रिपोर्ट झाले आहेत कीं बेकार झालेले व अन्नास महाग झालेले लोकांची संख्या तेथेंही वाढत चालली आहे. अबर्डिन एथेंही हीच अवस्था आहे. ४३० लोकांनीं सूपकिचनकडे अन्न मिळविण्याची सोय केली व हजारों जण रस्ते झाडण्याकडे लागले आहेत. आरब्रोथ एथेंही हलाखी आहे. व तिच्या निवारणाचे उपाय चालू आहेत. ३० चांगलीं कुटुंबें अन्नास मोताद झालीं आहेत. दंडी एथील सेंट्रल रिलीफ कमिटीनें २०००० रु. फंड जमविला आहे व लोकांस मदत देणें सुरू केलें आहे. एका परगण्यांत आपत्ति आपलें भयंकर स्वरूप दाखवीत आहे. पुष्कळ घरांतून वस्त्रांचा तुकडा नाहीं, फर्निचर नाहीं, आणि अन्नाचे हाल आहेत, तितक्यांची चौकशी व त्यांनां पुरवठा करण्याचें रिलीफ कमिटीस फार कठीण पडलें आहे. तरी शेकडो जणास अन्न, वस्त्र, व कोळसे कमिट्याकडून पुरविले जात आहेत. एडिंबरा एथें ५०० मनुष्यांनीं रस्ते झाडण्याचीं कामें पतकरलीं आहेत. व कित्येक लोकांकरितां सूपकिचनें सुरू झालीं आहेत. लीथ एथें पुष्कळ अन्नार्थी लोकांस पब्लिक वर्क्स कामावर लाविलें आहे, पब्लिक वर्क्सचें तेथें एक फार मोठें काम आहे पण तें व्यापारास धक्का बसल्यानें लवकरच बंद होण्याचे बेतांत आहे. ग्लासगो शहरांत उद्योग रहित झालेल्या लोकांची संख्या ५००० झाली आहे. व त्यांतून सुमार निमे लोकांनां कामें दिलीं आहेत. त्यांकडे २५००० रुपये खर्च झाले. व पुढें दर आठवड्यांस २०००० रुपये त्यांनां पाहिजेत. ग्रीनाक एथें साकरेचा मोठा कारखाना आहे त्यांत मजूर लोकांचे पगार दहावा हिस्सा कमी केले आहेत, अशी सर्वत्रे अपेष्टा झाली आहे.

**कावुलचा अमीर** — आफगाणिस्थानांतून जाऊन आलेले मिशनरी रेवरेंड जुन यांनीं एका प्रसिद्ध सभेंत गेल्या महिन्यांत अमीराविषयीं कांहीं सांगितलें तें असें:—

अमीराला आह्मी स्वतां पाहिलें आहे. तो विद्वान नाहीं. त्याला लिहितां येत नाहीं व वाचतांही येत नाहीं. आपण शिकत कां नाहीं ? असें अमीरास विचारल्यावरून तो ह्मणाला कीं आपल्याकरितां शेकडो लिहिणारे वाचणारे आपले जवळ आहेत तर स्वतां शिकण्याचा उपयोग काय? त्याला इतिहासांतील गोष्टी आवडत असत. व त्या निघाल्या तर तो त्यांत मन घाली. ह्युज साहेबाचे व त्याचें भाषण चाललें असतां गोष्ट निघाली कीं साऱ्या पृथ्वींत उत्तम वीर कोण होऊन गेला ? अमीर ह्मणाला कीं नेपोलियन बोनापार्ट. त्यासारखा वीर पुरुष अजून दुसरा कोणी जन्मला नाहीं. अमीर आहारविहाराविषयीं आपण मोठे नेमस्त आहों असें लोकांत दाखवी. पण घरगुती मंडळींत तो मद्यपी होता. तो मोठा कुरेबाज व बांका शिपाई होता. अंबाला एथें त्याला ज्यांनीं ज्यांनीं पाहिले ते ह्मणतात कीं फौजेच्या मोठ्या मुख्याधिपतीसारखे त्याजमध्यें गुण होते तथापि तो मोठा क्रूर व दुष्ट होता यांत कांहीं संशय नाहीं. मिशनरी ह्मणतात कीं अमीराचीं पत्रें आह्मी वाचलीं व कित्येक लोकांचें मत आहे कीं तो फार सौम्य व लीन असून त्याची फार मानखंडणा झाली सबब त्याची दया केली पाहिजे, परंतु अमीराचे गुण या सद्वर्तनाच्या अगदी विरुद्ध होते असें आह्मी खात्रीनें सांगतों. मोठी लढाई होऊन अमीरास राज्यपद प्राप्त झालें. त्या कामीं तीन मनुष्यांनीं त्यास उत्तम सहाय केलें होतें. एके भावानें, एके पुतण्यानें, व एक मुलगा याकुबखान यानें. पण अमीरानें त्या तिघांच्याही उपकारावर अपकार केले. भावास हाल करून ठार मारलें. पुतण्यास लाहोरास अटकेंत ठेविलें तिकडेच तो मरण पावला. व याकुबखानालाही ६ वर्षें त्यानें कैदेत ठेविलें. अमिराला खुले मनाने बोलण्या चालण्याची आवड नसे. व जे त्याला चांगले जाणत होते ते पुरे समजत होते कीं अमीर हा केवळ मांग रामोशाचे हृदयाचा रानटी मनुष्य आहे! याकुबखान तरुण असून

सद्गृहस्थ आहे व त्यानें इंग्लिश भाषेचा अभ्यास केलेला आहे.

---

**काळे पाण्याकडील वसाहत** — इंग्लिश सरकार मोठे भयंकर गुन्हे करणारास जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा देते; पण ती फारशी त्रासकारक नाहीं असें आतां कळूं लागलें आहे. अंदामन बेटांत कैदी लोकांस बरीच मोकळीक आहे. व त्यांनीं तिकडे वसाहती केल्या आहेत. त्यांच्या त्यांच्यांत ह्मणजे कैदी स्त्रिया व कैदी पुरुष यांजमध्यें लग्नसंबंध नमून त्यांचे संसार चालू झाले आहेत. वर्षास अशीं कित्येक लग्नें होतात. तिगस्त सालीं ३७ लग्नें झालीं व गुदस्ता ६९ झालीं. यावरून तिकडे मुलांबाळांचा खटाटोप इकडील घरांप्रमाणें कैदी लोकांचा जमत आहे. हें एकप्रकारें बरेंच आहे. कैदी लोकांत च हीं लग्नें होतात असें नाहीं. त्या बेटांतील रहाणारे लोकही कैदी लोकांशीं लग्नसंबंध करीत आहेत. गेल्या वर्षीं दोन कैद्यांचीं लग्नें तेथील राहाणारांच्या मुलींशी झालीं असेंही समजलें आहे.

---

**लढाई.**— या आठवड्यांत लढाईसंबंधीं कांहीं वर्तमान नाहीं इंग्लिश सैन्यानें आतां अधिक पुढें जाऊं नये. व पादाक्रांत केलेल्या ठिकाणांचा बंदोबस्त राखावा असें चाललें आहे. मुलकी, दिवाणी व लोकसुखाचीं इतर कामें आतां चालूं लागलीं आहेत. जलालाबादेस मोठा दरबार भरविला त्यांत सुमार ४० अफगाण सरदार हजर होते त्यांतून कित्येकांस जनरल राबर्ट यांणीं नजराणें दिले. त्यांणीं अमीराची अंदाधुंदीची कारकीर्द संपून रशियाचे कचाट्यांत आपण न सांपडतां ब्रिटिश सरकारची आपण प्रजा झालों याजबद्दल संतोष दाखविला! कंदाहार एथें इंग्लिश सरकारचे तर्फे गवरनर नेमिला व सुरळीत राजव्यवस्था सुरूं झाली.

---

## श्री० थोरले माधवराव पेशवे यांचें भाषण.

(मागील अंकावरून पुढें चालू)

शेवटीं आतां आपणा सर्व सरदार लोकांस आणि सर्व प्रजा जनांस नम्रतेनें इतकेंच सांगतों कीं, आपण शांतचित्त झाला, उमेद धरिली, उत्साह बाळगला, आणि आह्मी पुढें योजिलेल्या कार्यास सहाय केलें तर आपणां सर्वांचें आणि आपल्या साऱ्या राष्ट्राचें अक्षय हित होणार आहे. ह्मणजे आपण सहाय देण्यास तयार असला, तर आह्मास आपले सर्व बेतबात उल्हासानें तडीस नेतां येतील. शत्रूंची खोड मोडतां येईल. राज्याची आबादी करतां येईल, न्यायमनसुबीचा पाया मजबूद करतां येईल. चांगले चांगले कायदे कानु करितां येतील. गांव शहरांचा बंदोबस्त करितां येईल. अधिकारी लोक गोरगरीबांवर उगीच जुलूम न करितील अशी त्यांवर दहशत ठेवतां येईल. चोर, ठक उत्पाती, परपीडक यांनां चांगलें शासन करतां येईल. हमारे पकडतां येतील. रस्ते, घाट, तलाव, विहिरी, धर्मशाळा, देवालयें, अन्नसत्रें यांची सुलभता करतां येईल. फार काय सांगावें? राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्याचे जे यथान्याय हक्क असतील त्यांस बालाग्र व्यत्यय कोणाकडून येऊं नये. आणि सर्वत्र न्याय, सुख, संतोष, उत्साह आणि प्रसन्नता मूर्तिमंत नांदावी असें आह्मी मनापासून इच्छितों. आणि सर्वांचीं मनें अंतर्साक्षी परमेश्वर जाणतो आहे तर तो कोण्याबाधि मनुष्यांच्या सुखाकरितां जी निरपेक्ष इच्छा आह्मी धारण केली आहे तिला आशीर्वाद देऊन तसें घडवून आणील अशी उमेद बाळगतों. आणि त्याकरितां त्याची प्रार्थना करितों.

---

## वऱ्हाड.

---

थंडीनें पुन्हा आपला अमल जारी केला आहे.

---

असें ऐकण्यांत आलें आहे कीं उमरावतीच्या स्मालकाज कोर्टांतील २००रुपयाची रेजिस्ट्रारची जागा रिकामी आहे ती न भरतां अजीबाद कमी करणार.

---

चोऱ्यांचा कारखाना अलीकडे फार माजला आहे. गावांत अगरवेशीकडे थोड्या दिवसांत चोऱ्यांचे ४ प्रयत्न झाले. पैकीं दोहोंत मालापर्यंत मजल आली नाहीं, व दोहोंत माल चोरीस गेला. पोलिसांनीं जास्ती बंदोबस्त ठेवणें फार अवश्य आहे.

---

भाट लोकांच्या टोळीनें निजाम सरकारच्या हद्दीजवळ खानदेशांत दोन गावांत डाके घातलेले ९७ भाट लोक कैद होऊन धुळ्यास चौकशी साठीं गेले. तेथें सेशन जडजांनीं त्यांपैकीं ४९ लोकांवर अपराध शाबीद ठरवून १२ जणास जन्मठेपेच्या, आणि बाकीच्यास दहा व सात वर्षांच्या कैदेच्या शिक्षा दिल्या. चोरीचे जिन्नस लपविण्याची यांची मोठी पराकाष्ठा होती. निजण्याचे बाजांचे खूर पोकळ ठेवून त्यांत १८०० रुपये रोख व इतर जिन्नस त्यांनीं ठेविले होते ते पोलिसानें सर्व पकडले.

---

अकोल्याचे सिविल सर्जनची जागा डा० लिटल साहेब स्यानिटरी कमिशनर झाल्यानें रिकामी होती तिजवर या आठवड्याचे हिं० सरकारचे ग्याझटांत सरजन टी ह्यूम एम डी यांची नेमणूक होऊन आली आहे. हे हैदराबाद कांटिनेंटच्या फर्स्ट इन्फन्ट्रींतील मेडिकल आफिसर आहेत.

---

असिस्टंट अपाथिकरी डा. गेड साहेब अकोल्याच्या सिव्हिल सर्जनचे असिस्टंट होते त्यांस लष्करी खात्याकडे दिलें.

---

ताजुदीन साहेबाचे रजेंत क्या. रेनिक साहेब यांस फर्स्ट क्लास व मि. डेविस सा. यांस सेकंड क्लास आफिशियेटिंग असिस्टंट कमिशनर केलें असल्याविषयीं अलीकडच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

---

सिनिअर आपाथिकरी डा० मिनेस यास ईस्ट इंडियामध्यें आनररी सर्जनची पदवी मिळाली.

---

मेजर बुषबी साहेब बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर यांस तारीख १० आगष्ट सन १८७८ इसवीपासून लेफटिनेंट कर्नलची पदवी मिळाली.

---

क्या० बुलक साहेब अकोल्याचे डिपुटी कमिशनर व क्या० लडलो साहेब हैसुराकडून येणारे असिस्टंट कमिशनर यांस तारीख ११ डिसेंबर पासून मेजरची पदवी मिळाली.

---

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं अकोल्याचे आफीशियेटिंग तहशिल्दार सखाराम दत्तात्रय हे जळगावाहून अकोल्यास येईपर्यंत च्यार महिने च्यार दिवस रिकामे होते त्याबद्दल त्यांनां घरगुती कामाची रजा कमिशनर साहेबानीं देऊन ती रेसिडेंट साहेबाकडून मंजूर करून आणली.

---

विद्याखात्याचे डायरेक्टरच्या हेड क्लार्कच्या रिकाम्या जागेवर रा. रा. गंगाधर वासुदेव निमोणकर सेकंड क्लार्क यांस नेमिले. हे हुशार व या कामास लायक आहेत ह्मणून हीं जागा त्यांनां मिळाल्याचा आह्मांस संतोष वाटतो.

---

रा. रा. भीमराव साहेब अल्यांची मोशीहून एप्रिल महिन्यांत कोर्टांसह उमरावतीस येणार.

---

मे० यासीनखा साहेब उमरावतीचे अल्याची यांस कमिशनर साहेबांनीं आपले स्वारीबरोबर फिरावयास घेतलें आहे.

---

अकोल्यास बुधवारीं सूर्यग्रहण पहाण्या करितां दुर्बीण वगैरे सामान घेऊन कित्येक मंडळी गावाबाहेर गेली होती. व बोदवडकर ज्योतिषी यांचे मताप्रमाणें ३ अवर ५८ मिनिटाला ग्रहण लागेल ह्मणून त्यांनीं फार चारकाव्यानें पाहिलें पण त्या वेळेपासून सूर्य अस्ताचलास संपूर्ण जाईपर्यंत ग्रहणाचा लवलेशही दिसला नाहीं. व बोदवडकर यांची प्रतिज्ञा केवळ मिथ्या झाली.

---

इलिचपुरास हीं ११ वे तारखेस सरटिफिकिटें व शाळांचीं बक्षिसें देण्याकारितां समारंभ झाला होता.

---

रा० रा० केशवराव महिपत खारकर ए. अ. कमिशनर ह्यानां अलीशान रेसिडेंट साहेबांनीं पहिले वर्गाचे माजिस्त्रेटचा व ५००० रुपयेपर्यंत दिवाणी दावे फैसल करण्याचा अधिकार दिला. उ. अ.

---

## वर्तमानसार.

---

व्यांकीपुराहून गयेस जाण्याच्या रस्त्यावर रेलवेचें काम चालू होतें तें जहानापर्यंत १९ कोस तयार झालें व पुढील आठवड्यांत तेथपर्यंत गाडी चालू होणार आहे.

मद्रासेस बंदर धक्का बांधण्याचें काम चालू आहे त्याला गेल्या नोवेंबर अखेर पावेतों २२९०३६८ रुपये खर्च झाला. व पुढें काम चालू आहे.

कलकत्यास ब्राह्म मताचा समाज आहे त्याचा ४९ व्या वर्षाचा समारंभ मोठ्या थाटानें १० दिवस होणार आहे.

विद्युलतेच्या तेजानें अलीकडे फोटोग्राफाच्या तसबिरी घेतल्या आहेत त्या एरवीच्या सूर्याच्या छायेच्या तसबिरी पेक्षां फार सुंदर निघाल्या असून त्यांत कठीणता अगदी नाहीं. हातानें काढलेल्या चित्राप्रमाणें त्या गुलगुलीत दिसतात.

बडोद्याचे दिवाण राजे सर टी माधवराव आपले मुलाचे लग्नाकरितां मद्रासकडे जात आहे. ते सोमवारीं पुण्यास पोचले. किब्याचे वाड्यांत राहिले होते. त्यांनां सरकारी कामदारांनीं समारभानें रेलवे स्टेशनावर जाऊन अदरानें बिऱ्हाडी नेलें.

गेल्या सालांतील होळकर सरकारच्या जमाखर्चाचें थोडेसें टिपण समजलें आहे तें असें:—

त्यांच्या खाजगत खर्चाकडे ६ लक्ष रुपये लागले. व खासगत खर्चाकडील उत्पन्न साडे आठ लक्ष रु. झाले. लष्करी व पोलिस खर्च १९ लक्ष झाला. इंदूर संस्थानची जमा त्या सालीं ६० लक्ष झाली. दिवाणी फौजदारी मुकदम्यांत जुरी नेमण्याची त्यांनीं या सालांत वहिवाट ठेविली ती चांगली फायदेशीर आहे असें दिसून आलें.

लार्ड लिटन साहेब हिंदुस्थानचे व्हाईसराय राजीनामा देऊन जाण्याचे बेतांत आहेत असें स्टेट्समन पत्रांत लिहिलें आहे.

नेपाळचे सर जंगबहादर यांच्या स्त्रिया द्वारका वगैरे तीर्थांचे कामीं जाण्याकरितां मुंबईस आल्या आहेत.

मुंबईस वकिलीची परीक्षा तिसरे तारखेस सुरू होईल.

सुरत एडिटर खटल्यांतील प्रसिद्ध पोलिस इन्स्पेक्टर मि० मोतीलाल यांस कर्ज पुष्कळ आहे असें दिसतें. रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवणचे बाळाजी आनंदजी नावाचे गृहस्थानें तेथील सबार्डिनेट जडजच्या कोर्टांत मोतीलाल याजवर तीन फिर्यादी केल्या आहेत, त्यांची मागणीची रकम २५४२८ रुपये आहे, त्याजबद्दल समन्स सुरतेस नुकतींच येऊन मोतीलाल याणीं तीं रुजू करून दिलीं आहेत. एवढ्या मोठ्या कामदाराला इतकें मोठें कर्ज हें कसें काय आहे? मोतीलालाविषयीं पुष्कळ बोभाटा आहे आणि सरकारी ठरावाविरुद्ध हा कर्जबाजारीपणाही त्यांनीं केला आहे तेव्हां आतां त्यां विषयीं काय विच्यार होतो, पहावें.

सयाम देशांत अपराधाकरितां मोठमोठ्या अधिकाऱ्यांसही फटके मारण्याचा कायदा आहे.

सिमल्या कडे बर्फ पुष्कळ पडूं लागलें आहे. ९ ज्या तारखेस दीड इंच बर्फाचा थर होता.

मुंबईचे सालिसिटर मि० गांधी भाई जहांगीर मेढो हे स्मालकास कोर्टांत काम चालवीत असतां एकाएकीं खालीं बसून मरण पावले. पांच काळजांतील रोग होता.

कलकत्त्यास फेब्रुवारीचे पहिले तारखेस स्टार आफ इंडियाचे किताब किसेकास देण्याचा समारंभ व्हाइसराय साहेब करणार आहेत. मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेबही त्या वेळीं तेथें जाणार आहेत. हल्लीं ते गुजराथेंतून सिंधप्रांतीं जाऊन आफगाण घाटपर्यंत जाऊन आले.

काठेवाडकडून सिंध हैद्राबादेपर्यंत रेल्वे करण्याचा सर रि. टेंपल साहेबाचा विचार आहे.

अमीर शेर अल्ली यानें अपघात करून घेतला असें वर्तमान आलें होतें तें खोटें आहे.

रा. रा. विनायकराव वासुदेव ओरियंटल ट्रान्सलेटर यांची १००० रुपयाची जागा रा. ब. माधवराव बर्वे कोल्हापुरचे कारभारी यास मिळण्याची वार्ता आहे.

धारवाड बुक डिपोंत जी ७।८ हजार रुपयांची तूट आली, ती त्या जिल्ह्याचे डिप्टी एज्युकेशनल इन्स्पेक्टर रा.सा. चेनबसप्पा यांच्या कसूरीमुळें आली ती त्यांणीं भरावी असा ठराव झाल्याचें मागें समजलें होतें, परंतु धारवाड वृत्तावरून कळतें कीं, ती सारी रक्कम त्यांजवर न घालतां सुमारें ९ हजारांची रक्कम त्यांजवर लादण्याचा डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांनीं ठराव केला.

राणी साहेबास जिवें मारण्याची भीति घालणारा एडमन्ड बायरन मेडन याची चौकशी होऊन राणी साहेबांचे इच्छेस येईल तितके दिवस कैदेची शिक्षा त्यास झाली.

महाराज जयाजीराव शिंदे यांची तब्येत आतां बरी आहे

श्रीमंत सौभाग्यवती बयाबाई साहेब आपटे (श्रीमंत बाजीराव साहेब पेशवे यांची कन्या) यांची स्वारी महाराज साहेब यांचे निमंत्रणावरून पौत्रोत्साहाकरितां इंदूर एथें आली आहे

पारिस येथील डेव्हेनली साहेबानें विजेच्या योगानें अक्षरें खोदण्याची लेखण तयार करण्याची नवीन युक्ति काढली आहे. ती अशी कीं तांब्याच्या किंवा जस्ताच्या पत्र्यावर कागद लावून रमकार्फच्या बाटरीचें एक टोंक पत्र्याला जोडावें व दुसरें लेखणीचे बाचे टोंकास जोडावें नंतर त्या पेनानें नकाशा किंवा अक्षरें त्या कागदावर काढावीं म्हणजे विजेच्या प्रवाहामुळें तो कागद अक्षरांच्या जागीं फाटला जातो मग त्यावरून शाईचा रोळ फिरवून तो पत्र्या पाण्यांत बुडवावा म्हणजे कागद निघून जातो. तो गेल्यावर पत्रा आसिडांत बुडवावा म्हणजे अक्षरें खोदल्यासारखीं उठतात. ह्या युक्तीनें कारागिराला त्या विजेच्या ठिणगीपेक्षां काम करण्याला ज्यास्ती उजेडाची जरूरी नाहीं.

हिंदुस्थान सरकारचे कायदे कौन्सिलाकारितां बिलांचे मसुदे तयार करण्यासाठीं एक "ला कमिशन" नवीन स्थापन होणार आहे अशी बातमी समजते. मद्रासचे चीफ जस्टिस सर चार्लस टर्नर यांची सदरहू कौन्सिलाचे अध्यक्षाचे जागीं नेमणूक होणार व मुंबई एथील हायकोर्टांतील जज मि. रेमंड वेस्ट यांची सदरहू कौन्सिलांतील एका सभासदाचे जागीं नेमणूक होणार असून अध्यक्ष यांस दरमाहा ७००० रुपये व सभासद यांस दरमहा ५००० रुपये पगार मिळणार असें मुंबई गव्हर्नमेंट गझेटावरून समजतें. या कौन्सिलांत किती सभासद नेमणार व या संबंधानें एकंदर काय खर्च होणार आहे वगैरे कसें हकीकत कळल्याशिवाय कांहीं ज्यास्त लिहितां येत नाहीं.

विजेच्या योगानें चोर आलेले किंवा आग लागलेली समजण्याचा उपाय — ऐन व महागोनी लांकडाच्या पेट्या घेऊन त्यांपैकीं एकींत ब्याटरी व दुसरींत घांट ठेवलेली असते. ह्या यंत्राला तीन तारा असतात त्या व्यवस्थेनें दारें व खिडक्या किंवा टेबलाची अगर कपाटांची पुढें असतील त्यांस लावाव्या म्हणजे तीं उघडतांना विजेचा प्रवाह सुरू होऊन बाजा वाजण्यास आरंभ होतो. आग लागलेली समजण्याकरितां ब्याटरीची एक तार उष्णमापक यंत्राचे पाऱ्याचे गड्डयांत घातली असते व दुसरी नळींत कांहीं अंतरावर आणून सोडलेली असते. आगीचे उष्णतेनें पारा चढतो तारेचे टोंकापर्यंत जेव्हां पारा जातो तेव्हां वीज वहाण्यास सुरू होऊन बाजा होतो.

दुष्काळाच्या संबंधानें मद्रास सरकारास ३१ मार्च १८७७ अखेर १,८२,३६,२४० रुपये व तारीख ३१ मार्च सन १८७८ अखेर १७,२२,७७४ रुपये खर्च आला

चालू सालच्या म्याट्रिक्युलेशनचे परिक्षेस कलकत्त्यास २,६१७ उमेद्वार होते व ९२४ लिटलगोच्या परिक्षेस गेले होते. व मद्रास एथें म्याट्रिक्युलेशनचे परिक्षेस सुमारें ३००० उमेदवार गेले होते.

हिंदुस्थानांतील स्टांपाचें उत्पन्न दरसाल कसें वाढत चाललें आहे हें पुढें लिहिलेल्या हकीकतीवरून लक्षांत येईल. सन १८१५-१६ सालांत १५,३१,००० होतें, परंतु यावेळीं हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यसत्ता फार विस्तृत नव्हती. सन १८१८ सालांत महाराष्ट्र वगैरे प्रांत इंग्रज अमलाखालीं आल्यावर स्टांपाचें उत्पन्न नेहेंच वाढलें. सन १८२७ पासून सन १८४८ सालापर्यंत ३५ लाखापासून ४६ लाख पर्यंत वाढलें. नंतर दालहौसी कारकीर्दींत आणखी कांहीं नेटिव संस्थानें इंग्रजी अमलाखालीं आलीं व सन १८६० सालांत जेव्हां जनरल स्टांप आक्ट झाला तेव्हां बहुतेक दुप्पट उत्पन्न झालें. सन १८६०-६१ सालीं स्टांपाचें उत्पन्न १,१८,९८,००० झालें पुढें ६१-६२ सालांत १,६९,१४,२०० रुपये झाले. ६५—६६ सालांत १,९९,४६,३२० रुपये झाले. व सन १८७० सालीं तेंच उत्पन्न २,३७,९३,१९० रुपये झाले.

## यज्ञ आणि पर्जन्य यांचा संबंध.

सांप्रत विद्येची इतकी भरभराटी आहे कीं, ज्या पंचमहाभूतांस आम्ही ईश्वररूप मानीत होतों, तीं हल्लीं मनुष्याचे स्वाधीन होऊन जे कधीं पाहिले नाहींत ते अद्भुत चमत्कार होऊं लागले आहेत ते कोणते म्हणाल तर विद्युल्लतेनें प्रतिध्वनि काढणें, व दिवसाचा उजेड कोठींत सांठविणें, असे नानाप्रकारचे अद्भुत चमत्कार परकीय लोक करूं लागले आहेत, त्याचप्रमाणें आमचेही लोक विद्येच्या जोरानें नवीन धर्म स्थापूं लागले आहेत. एकंदरीनें पाहूं गेलें असतां या देशाची स्थिति पालटण्याचें चिन्ह दिसत आहे. कारण जसजसें मनुष्याचें ज्ञान वाढत जाईल तसतसा सत्यतेचा प्रकाश पडून धर्माचा उत्कर्ष होण्याची आशा आहे. सांप्रत घाटावर आणि वऱ्हाडांत अशी वंडी ऐकण्यांत आली आहे कीं लवकरच सत्ययुग होणार, याचें कारण आपल्या राज्यकर्त्यांनीं हिंदुस्थानाची बादशाहीण ही पदवी घेतली हें असावें. कारण इतिहासाचे द्वारें पाहिलें असतां पूर्वीं मुसलमानी बादशहा पुष्कळ होऊन गेले. त्यांत अकबरासारिखे परधर्मांचे बादशहा झाले, त्यांनीं प्रजेचें लेकराप्रमाणें पालन केलें, यावरून हिंदु लोक त्यास देवाप्रमाणें मान देतात, यापेक्षां आमचे प्रस्तुतचे राज्यकर्ते तर सुज्ञ, सुविचारी, आणि पराक्रमी तेव्हां त्यांच्या गुणांचें वर्णन करूं तितकें थोडेंच आहे म्हणून सर्वांस सत्ययुग होण्याची आशा आहे. आतां सत्ययुगांतील आचरण व यज्ञयागादि क्रिया हीं सर्वांस विदित आहेतच. आज हें लिहिण्यास कारण कीं सुमारें एका वर्षांचे आंतील एका आपल्या इंदूत 'यज्ञ आणि पर्जन्य यांचा संबंध काय ?' असा प्रश्न गीतेंतील "अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः। यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः॥' या श्लोकाचें प्रमाण देऊन एकानें प्रश्न केला होता हें वाचकांस माहीतच असेल. आतां ज्या ज्या काळीं यज्ञादिक क्रिया बंद पडल्या त्या त्या वेळीं अवर्षण पडलें हें प्राचीन इतिहासावरून सिद्ध होतेंच. सांप्रत ही त्याचप्रमाणें होत आहे. यज्ञ न केल्यामुळें लहान मोठे पुष्कळ भयंकर परिणाम भरतखंडावर प्राप्त होत आहेत, त्यांतून तीन मोठे होत चाललेले आहेत. पहिला महामारी. दुसरा यज्ञ न केल्यापासून भयंकर परिणाम म्हणजे अवर्षण पडणें हा होय. ज्या प्रमाणें स्त्री आणि पुरुष यांच्या संयोगापासून मूल प्राप्त होतें, त्याप्रमाणें यज्ञ आणि मेघ या परस्परांचा संयोग होऊन पाऊस पडत असावा असें वाटतें. कोणी म्हणतील ही ईश्वरी कृति आहे. परंतु डाक्टरासारखे एखादी चिकित्सा करितील कीं, स्त्री व पुरुष या उभयांचे रेतांतील अति सूक्ष्म किडे एकत्र होऊन, स्त्रीच्या पोटांत ते आपला व्यापार करितात; आणि जर त्या रेतांत त्या प्रकारचे किडे नसले तर त्यास मूल होणार नाहीं त्याचप्रमाणें आमचे पूर्वज ज्यांस ऋषि म्हणतात ते केवळ गावठी वैद्यांप्रमाणें एक दोनवनस्पतींचा गुण दाखवून अज्ञानी लोकांस मुळापासून कोट्यवधि लोकांचा नाश करणारे नव्हते, तर ते युरोपखंडांतल्या डाक्तराप्रमाणें होते. ते आपलें आयुष्य रसायनशास्त्रांत घालवून अशीं कृत्यें करीत होते कीं ज्यामध्यें स्वार्थ आणि परमार्थ साधून लोकांचें कल्याण व्हावें. परंतु आमच्या सारख्या असमंजस लोकांस असें वाटूं लागलें कीं, कोट्यवधि रुपयांचा खर्च होऊन अग्नीच्या मुखांत नानाप्रकारचे पदार्थ घालणें हा केवळ मूर्खपणा होय. म्हणून त्यावरून "देवाची प्रार्थना" इत्यादि नाना प्रकारचीं मतें स्थापन झाल्या कारणानें यज्ञयागादि क्रिया बंद पडल्या, त्यामुळें हे भयंकर परिणाम होत चालले आहेत. आमच्या पूर्वजांनीं सूर्याच्या किरणांनीं पाण्याचे ऐटम म्हणजे परिमाणु आकर्षण करून ते आकाशांत गेल्यावर थंडीनें एकत्र जमून मेघ दगडासारखे झाल्यानें वायुचक्रास फोडण्यास तें कठीण पडूं नयेत म्हणून अशी योजना केली असावी कीं यज्ञ आणि याग यांमध्यें तूप अर्पण करून करून त्याचें आगीनें रूपांतर केल्यानें त्याचे ऐटम पाण्याचे ऐटमाशीं मिश्र होऊन त्यानें मेघ ढिसूळ होऊन वायुचक्रास फोडण्यास सुलभ पडून वेळच्या वेळेस पाऊस पडत होता, आणि ते ज्ञानी व दूरविचारी असे होते कीं, हिंदूंचा काळ असाच चालणार नाहीं, म्हणून त्यांनीं मूर्तिपूजा स्थापिली असावी. कारण अशी म्हण आहे कीं दहाकी लकडी एकका बोजा या म्हणी प्रमाणें वैश्वदेव, मूर्तीपुढें तुपाचे दिवे, आरत्या, काकडआरत्या, धुपारत्या, त्याचप्रमाणें नानाप्रकारच्या वातींचीं नांवें ठेवून या देशांतील धर्मभोळे लोक पुण्याच्या आशेनें जाळीत होते, परंतु सांप्रत सुधारणा फार झाल्यानें असें म्हणूं लागले कीं ज्यांत काय आहे? हें एक कारण, दुसरें लोकांत दारिद्र दिवसेंदिवस झाल्यानें तेल खाण्यास मिळणें कठीण, तर तुपाची गोष्ट दूरच. सरकार महाराज, तेव्हां हल्लींतिसऱ्या भयंकर परिणामाचें चिन्ह दिसत आहे. ई प्र.

## नवी जाहिरात.

आम्हांकडे प्रसिद्ध लोकहित वादींनीं कित्येक पुस्तकें ठिकठिकाणच्या लायब्रऱ्यांस (पुस्तकालयास) बक्षिस देण्याकरितां ठेविलीं आहेत. त्यांचा लाभ ज्या लायब्रऱ्यांस पाहिजे असेल त्यांचे चिटणीसांनीं अर्ध्या आण्यापासून ९ आण्यांपर्यंत पोष्टाचीं टिकिटें पाठविल्यास तितक्या टपाल खर्चांत जितकीं पुस्तकें पाठवितां येतील तितकीं पाठवूं मात्र पत्राबरोबर लायब्ररीच्या ठिकाणच्या कोणा सभ्य गृहस्थाची ओळख असावी. ज्या लायब्रऱ्यांस लोकहित वादींचीं पुस्तकें गेलीं असतील त्यांची यादी चिटणीसांनीं पाठविल्यास त्या पुस्तकां शिवाय इतर पुस्तकें पाठविण्यांत येतील. कळावें, तारीख २० माहे जानेवारी सन १८७९.

हरी त्र्यंबक काळे.
नासिक वृत्ताचे मालक

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.